म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ~~३२३~~ १५० अ.

ऐतिह - २५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

इतिहास - ऐतिह - २५

गुप्ते, यशवंत बाळकृष्ण.

सार्दीपकर - गुप्ते यांची बखर.

ग्रं. सं. ठाणे

होता तेव्हां तो त्याणें आपले वाजंत्री घडशी यांस दिला, याप्रमाणें पुराणांत आहे. याविषयीं दुसरी गोष्ट ती अशी, इशावी सनाच्या आगोधर अडीचशें वर्षे हिंदूंच्या मुलखांत मोठी तागारा+ नामें राजधानी होती, तेथें मिश्रमुलखाचे व्यापारीलोक येतजात असत. त्यांपुढें कोणी एक शालीवाहन नामें नीच जातीचा पुरुष शककर्ता जाला, त्याणें त्याशहरीं राज्य केलें. तोराजा संन इशावीचे सत्याहत्तर अठ्याहत्तरांचे सुमारें जाला. त्यादिवसापासून हिंदूंमध्यें त्याचे नावें शक चालूं लागला.

याबखरींत इशावीसंन तारिखामात्र लिहिल्या, हल्लीं संन अठराशें एकुणतिसांचे चवथ्यामहिन्याचे पहिले तारिखेस हिंदूंचें शके सत्राशें एकावन्नावें वर्ष चालतें होणार.

## दुसऱ्या आवृत्तीची सूचना

याबखरीचें प्रथम एकच पुस्तक होतें त्याचे हाल्लीं दोन विभाग करून पहिल्याचें नाव पूर्वार्द्ध आणि दुसऱ्याचें नाव उत्तरार्द्ध ठेविलें आहे.

याबखरीचे एकंदर तेहतीस भाग केलेले आहेत त्यांतून पूर्वार्द्धांत सत्राभाग आणि उत्तरार्द्धांत सोळा भाग लिहून दोन पुस्तकें केलीं आहेत.

---

+ तागारा नामें शहर कोठें होतें तें आतां निश्चयें करून लिहितां येत नाहीं, परंतु हल्लीं गोदावरीचे कांठीं भीर नामें एक गांव आहे त्याचे ईशानी दिशेस असेलसें वाटतें.

# पूर्वार्धाची अनुक्रमणिका

## भाग पहिला

इसवी संन हजारांपासून संन चौदाशें अठ्याहत्तर पर्यंत.

१ मुसलमान लोकांनीं दक्षिण घेतल्याचा प्रकार. २ ते लोक नर्मदा उतरून देवगडा पर्यंत संचार करिते झाले. ३ तें शहर मुसलमान लोकांनीं आपली राजधानी करून त्याचें नाव दौलताबाद ठेविलें. ४ त्या लोकांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन मुसलमानांच्या राज्याच्या दोन फळ्या झाल्या. ५ ब्राह्मणी वंशाच्या बादशाहाच्या राज्याची गोष्ट. ६ तें राज्य असतां मराठी लोकांचें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण. ७ दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला तें. ८ त्यामुळें मुलूख ओस पडला, आणि किल्ले भलत्याच्या हस्तगत झाले. ९ त्याच्या बंदोबस्ताकरितां बादशाहानें सैन्य निघालें. १० दादू नरसू काळे यांणीं सरकारच्या वसुलाचा बंदोबस्त केला. ११ आणखी दोन वेळां राज्याच्या बंदोबस्तास बादशाहानें लष्कर योजिलें. १२ मुसलमानांनीं कोंकण पट्टी जिंकिली. १३ ब्राह्मणी बादशाहाच्या वंशाची समाप्ति कोणें कारणानें झाली तें. १४ निजामउल्मुल्क बहरी याची गोष्ट.

## भाग दुसरा

संन चौदाशें अठ्याहत्तरांपासून सोळाशें सदतीस पर्यंत.

१ ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर पांचराज्यें उत्पन्न झाली, त्यांतून कांहीं दिवसांनीं दोन बुडालीं, आणि तीन राहिलीं त्यांत एक अहंमदनगर, दुसरें विजापूर, तिसरें गोंवळकोंडें. या तिहीं राज्यांचे चतुःसीमेचा प्रकार, व त्यांची राज्य करण्याची रीति. २ मुसलमान लोकांचे राज्यांत मराठे लोक कोणत्या रीतीनें वागत होते, व मुसलमान लोक मराठ्यांची योग्यता कशी ठेवीत होते तें. ३ इदलशाहींत मराठ्यांनीं बंड केलें ते वेळेस बंड मोडण्याचे प्रसंगीं विजापूरचे बादशाहानें ब्राह्मणाचें माहात्म्य वाढविलें तें; आणि विजापूर व अहंमदनगर व गोंवळकोंडें या तिहीं राज्यांत बादशाह किती झाले तो प्रकार. ४ फिरंगीलोक जहाजावर बसून आले, आणि कोंकणांत शिरून गोंवें घेतलें; आणखी मोठा उपद्रव करून कोंकणचा वसूल घेतला. ५ विजापूरचा बादशाह व अहंमदनगरचा बादशाह हे दोघे मिळून फिरंगीलोकांशीं लढले, परंतु जय न पावले. ६ विजापूर व अहंमदनगर या दोहीं राज्यांत जितकीं मराठ्यांचीं कुळें होतीं त्यांचें वृत्त. ७ शिवाजीच्या मूळपुरुषाची कथा. ८ दिल्लीचा आकबर बादशाह याणें दक्षिणदेश जिंकिला, व तो मरण पावला तें. ९ मलिकंबराची वर्तणूक. १० लुखजी जाधवाचें वृत्त; व शाहजी भोंसल्याचें वर्तमान. ११ दिल्लीचा बादशाह जहानगीर याचे मरणाचा प्रकार; व त्याचा पुत्र शाहाजहान याचें स्थापन; व खानजहान लोदी याचें वृत्त; व शाहाजी भोंसल्याचें वर्तमान. १२ खानजहान लोदी मेल्यावर त्याचे सरदारांनीं निजामशाहाचा मुलूख घेतला तें. १३ विजापूरकर व अहंमदनगरकर यांचा तह ठरला. १४ मोर्ति

जा निजाम अहंमदनगरचा बादशाह त्यास फत्तेखानानें मारिलें. १५ मोंगललोकांनीं शहाजीभोंसल्यास दिलेला जो मुलूख तो फत्तेखानानें मोंगलांशीं स्नेह करून आपण घेतला, यास्तव शहाजीभोंसले विजापूरकरांस मिळाले. १६ मोंगललोक व फत्तेखान यांचा सलूख झाला असतां तो फत्तेखानानें मोडिला, ह्मणून त्यांचा व याचा युद्धप्रसंग पुनः झाला. १७ शहाजीभोंसल्यानें अहंमदनगरचें राज्य चालविलें. १८ दिल्लीचा बादशाह शहाजहान मोठें सैन्य घेऊन विजापुराकडे गेला. १९ विजापूरकर यांशीं शहाजहानानें युद्ध केलें; आणि त्यांचा व याचा सल्ला जाला. २० मोंगललोकांनीं शहाजीभोंसल्यास जिंकिल्यावर तो विजापूरकरांचे चाकरीस राहिला; त्यापुढें बहिरीवंश बुडाला. २१ तालीकोटचे लढाईचा प्रकार; व विजयानगरचें राज्य बुडालें तें प्रकरण.

## भाग तिसरा

सोळाशेंसततिसांपासूनसोळाशे अठ्ठेचाळीस पर्यंत.

१ शहाजी विजापूरकरांचे चाकरीस राहिल्यावर कसा वागत होता. २ मग त्याणें दुसरी बायको केली. ३ त्याच्या पहिल्या बायकोचे दोघे पुत्र, एक संभाजी, एक शिवाजी. ४ दुसरीचा एक व्यंकोजी. ५ तो शहाजी करनाटकांत गेला ते समयीं त्याणें आपली बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी यांस आपलें जहागीर ठिकाण पुणें येथें पाठविलें; आणि त्यांचा बंदोबस्त दादोजीकोंडदेव यास सांगितला. ६ विजापूरसरकार व गोंवळकोंडसरकार यांचीं लक्ष्यें कोणे प्रकारचीं होतीं तें. ७ मोंगल दक्षिणच्या वसुलाचा बंदोबस्त

करिता झाला तें, आणि त्याणें फसली तारीख कधीं स्थापिली तें वर्तमान. ८ दादोजी कोंडदेव याणें वसुलाचा बंदोबस्त कसा केला तें. ९ मावळे लोक यांची हकीकत. १० शिवाजीचे रक्षक यांणीं त्याचे बाळपणीं त्याला कोणते प्रकारें वागविलें तें. ११ त्या शिवाजीचे पक्षपाती पहिले तीघे कोण होते तें प्रकरण. १२ त्याणें तोरणा किल्ला घेतला. १३ तो आपणाकडेसच राहावा ह्मणून बादशाहास काय काय समजाविलें तें. १४ राजगड किल्ला शिवाजीनें बांधिला तें वृत्त. १५ दादोजीकोंडदेवाचा मृत्यु. १६ चाकणकिल्ला व कोंडाणेकिल्ला याचे लोक शिवाजीनें आपणास अनकूळ केले तें. १७ सुपेपरगणा व पुरंदर किल्ला शिवाजीनें घेतल्याचा प्रकार.

## भाग चवथा

सोळाशें अठ्ठेचाळिसां पासून सोळाशें सत्तावंन पर्यंत.

१ शिवाजीनें घेतलेल्या मुलखाचे सभोंवते कोण कोणते अधिकारी व जाहागीरदार होते तो प्रकार, व वाडीचा सांवत आणि जंजीऱ्याचा शिद्दी यांचें प्रकरण. २ शिवाजीनें छापा घालून बादशाहाचा खजीना लुटला. ३ त्या शिवाजीनें कितीएक किल्ले युक्तीनें घेतले. ४ कालियानी परगणा शिवाजीनें घेतला तो विस्तार. ५ विजापूरचे बादशाहानें शहाजी कैदकरून विजापूरीं आणविला. ६ त्याची सुटका कोणे प्रकारें झाली तें. ७ तो शहाजी करनाटकांत गेला, आणि आपला पुत्र संभाजी कोणी एका किल्लेदाराचे पारिपत्यास योजिला असतां तो मृत्यु पावला. ८ शिवाजीनें जावळीचा राजा घातानें मारविला, आणि त्याचा मुलूख घेतला. ९ शिवाजीनें पहिला पेशवा शामराज नामें ब्राह्मण होता तो केला. १० संनसो

व्याशीं छत्तिसांपासून मोंगलांची वर्तणूक कसकशी झाली तें. ११ गोंवळकोंडेकरांचा कारभारी मीरजुमला याचें वृत्त. १२ दिल्लीचे मोंगल विजापूर घ्यावयास गेले तो विस्तार, व शाहाजहान दिल्लीचा बादशाह दुखण्यां पडला. १३ तो जिवंत असतां त्याचे पुत्र चौघे ते राज्याची इच्छा करूं लागले, व त्या चौघां जणांत एक औरंगजेब नामें होता त्याचे स्वभावाचें वर्णन, व तो बापास कैद करून आपण बळेंच तक्ताधिपति झाला.

## भाग पांचवा

सोळाशें सत्तावन्नांपासून सोळाशें बासष्ट पर्यंत.

१ शिवाजीनें औरंगजेबाशीं नम्र भावें करून बोलत असून मोगलांशीं कृत्रिम केलें. २ शिवाजीनें आपल्या लश्करांत स्वार वाढवून पठाण मुसलमान लोक चाकरीस ठेविले. ३ विजापूरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं त्यांपासून काय झालें तें. ४ शिवाजीचा शामराज पेशवा राजपुरचे शिद्दीपासून पराभव पावला, त्यावर शिवाजीचा राग होऊन त्याणें मोरो त्रिंमळ पिंगळा नामें दुसरा पेशवा केला. ५ वाडीचे सांवत पहिल्यानें शिवाजीस मिळाले, मग लवकरच विजापूर करांकडचे झाले. ६ विजापूर करांकडून शिवाजीचे पारिपत्यास मोठें सैन्य आलें. ७ त्या सैन्याचा मुख्य सरदार आफसुलखान तो शिवाजीनें कशा युक्तीनें मारिला तें प्रकरण. ८ शिवाजीनें विजापूरचा रुस्तमजमान सरदार याचा पराभव करून विजापूरचे दरवाज्यापर्यंत मुलूख लुटला, व त्वरेनें कोकणांत जाऊन राजपुरी व दाभोळ लुटली. ९ त्या शिवाजीचे पारिपत्यास दुसरें पुनः सैन्य नेमून त्याचा मुख्य सरदार शिद्दीजोहार केला, त्याणें

पन्हाळ्यावर शिवाजी असतां त्या किल्ल्यास वेढा घातला. १० असें असतां तो शिवाजी वांचला कसा; व त्याचा कारकून हरणसमावळचा देशपांड्या बाजीपरभू याणें काय पराक्रम केला तें. ११ विजापूरचा बादशाह अल्लीआदिलशाह याणें शिवाजीनें घेतलेला मुलूख आपण सैन्यसुद्धां येऊन सोडविला तें. १२ पुनः शिवाजीनें कितीएक किल्ले घेतले तें; व त्याचे बापास ज्याणें धरून विजापुरीं नेलें तो बाजीघोरपडा त्यास सांपडला; त्याला मारून त्याचें गांव मुधोळ तें जाळिलें. १३ सांवतांचा वाडीप्रांत शिवाजीनें घेतला तो प्रकार. १४ विजापूरकरांशीं तह केला तें वर्तमान; व शहाजी शिवाजीचे भेटीस आला तें प्रकरण. १५ रायगड किल्ल्याची गोष्ट. १६ शिवाजीचें लश्कर किती होतें तें; व त्याचे मुलखाची हद्द किती होती तें.

## भाग सहावा

संन सोळाशें बासष्टां पासून संन सोळाशें सदसष्टां पर्यंत.

१ शिवाजीनें मोंगलांचा मुलूख घेण्याचा उद्योग केला. २ म्हणून त्यावर औरंगजेब बादशाह याणें षाइस्तेखान नामें सरदार याची योजना दिल्लीहून केली. ३ त्या षाइस्तेखानानें पुण्यास येऊन चाकण किल्ला घेतला. ४ त्यापुढें शिवाजीनें काय पराक्रम केला तें प्रकरण. ५ दिल्लीहून बादशाहानें त्या षाइस्तेखानाला माघारें बोलावून सुलतान माजूम नामें दुसरा सरदार दक्षिणेस योजिला. ६ शिवाजीनें सुरत लुटली. ७ शहाजीचा मृत्यु. ८ शिवाजीनें आपल्या नावास राजा असें पद जोडून आपल्याच नावानें शिक्के चालविले; आणि तेच समयीं अहंमदनगर लुटलें. ९ जेलोक मक्केस

तीर्थयात्रेकरितां जाणारे ते शिवाजीच्या लढाऊ गलबतांनीं जाऊन लुटले. १० तो शिवाजी मालवणापाशीं गलबतावर चढून समुद्रांतून जाऊन गोंव्याचे दक्षिणेस बारशिलोर नामें शहर होतें तें लुटिता झाला. ११ शिवाजीस जिंकावयास राजा जयशिंग व दिलीरखान हे दोघे त्याला नकळतां त्याचे मुलखीं जाऊन पोंहचले. ८ त्यांणीं कांहीं स्थानें घेतलीं ह्मणून शिवाजीला भय प्राप्त झालें तें. १३ पुरंदर किल्ल्यास घेरा घातला तें वर्तमान. १४ शिवाजी युद्ध सोडून राजा जयशिंग व दिलीरखान या दोघां सरदारांच्या आज्ञेंन चालूं लागला, आणि त्यावेळेस त्याणें कांहीं ठराव करून घेतला. १५ त्यावरून विजापूरकरांचा व त्या सरदारांचा युद्धप्रसंग घडला. १६ त्यापुढें शिवाजी बादशाहाचे भेटीस दिल्लीस गेला तेव्हां ओरंगजेबानें त्याला बंदींत ठेविलें असतां त्याणें आपला जीव कोणत्या प्रकारानें वांचविला तें. १७ विजापूरकरांशीं जयशिंग लढला, त्याजयशिंगानें विजापुरास घेरा घातला असतां त्यांहीं तो मागें हटविला; तो जयशिंग माघारा दिल्लीस जात असतां वाटेनें मृत्यु पावला.

## भाग सातवा

संनसोळाशें सदसष्टांपासून संनसोळाशेंएकुणहत्तरपर्यंत.

१ सुलतान माजुम आणि यशवंतशिंग यांच्या स्वभावांचा प्रकार. २ त्यांचे योगें करून शिवाजीस बादशाहाकडून कांहीं उपकार घडला. ३ विजापूरकरांशीं आणि मोंगललोकांशीं सल्ला झाला. ४ विजापूरकर व गोंवळकोंडेकर यांणीं वर्षासिशिवाजीला खंडणी द्यावी असा नेम ठरला. ५ गोवें आणि जंजी

रा घ्यावयास शिवाजी गेला, परंतु जय पावला नाहीं. ६ शिवाजी आपल्या मुलखी वसुलाचा व लष्कराचा बंदोबस्त करीत असतां लोक नाना प्रकारच्या अटकळी करीत होते तें. ७ त्याणें नवे कायदे चालविले तो प्रकार. ८ त्याचे जवळ राज्य कारभार चालविणारे कोण कोण कसे कसे होते तें प्रकरण.

## भाग आठवा

संन सोळाशें सत्तरां पासून संन सोळाशें सत्याहत्तर पर्यंत.

१ पूर्वी लोकांस असें वाटत होतें कीं, आतां दक्षिण देशीं बहूत दिवस पर्यंत उपद्रव होणार नाहीं, परंतु त्यास अंतर पडलें तो प्रकार. २ तानाजी मालुसरा याणें सिंहगड घेतला, आणि त्याच वेळेस तो तेथें मृत्यु पावला. ३ आणखी कितीएक किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले. ४ जंजीरा शिवाजीनें घेतलाच असता, परंतु तिघां शिद्दीं मुळें त्याचे हातीं लागला नाहीं, व ते शिद्दी आपला मुलूख मोंगलांस देऊन त्यांचे चाकरीस राहिले तें. ५ शिवाजी सुरत लुटून माघारा गेला त्या वेळेस त्याला धरावया करितां मोंगल जे गेले ते त्याणें जिंकिले, ६ शिवाजीनें खानदेश लुटला, आणि वसुलाची चवथाई प्रतिवर्षी घेत जावी असें ठरलें, व औंडा पाटा व साल्हेर हे किल्ले घेतले. ७ मोंगल लोक शिवाजीस जिंकावयास आळस किंनिमित्त करीत होते तें.

८ मोंगलांच्या राज्यांतून दक्षण देशाचा कांहीं नवा बंदोबस्त झाला तें, आणि मराठे लोक व मोंगल लोक यांचे युद्धांत मराठे जय पावून मोठे विख्यात झाले तें प्रकरण. ९ शिवाजीचें आणि इंग्रेजांचें कांहीं बालणें झालें तें. १० शिवाजीनें गोंवळकोंडया

मध्यें स्वारी केली असतां त्याचे पाठीमागें जंजीऱ्याहून आणि सुरतेहून लढाऊ गलबतें येऊन समुद्रतीरचे त्याचे गांव लुटले ११ विजापूरचा बादशाह अल्ली आदिलशाह याचा मृत्यु. १२ शिवाजीनें हुबळी शहर लुटलें, आणि विजापूरचे सरकाराशीं युद्ध केलें, व परळी वगैरे किल्ले घेतले. १३ शिवाजी आणि प्रतापराव यांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें तें. १४ शिवाजीनें कांहीं क्रोधेंकरून निरोप पाठविला ह्मणून तो प्रतापराव विजापूरचे लष्कराशीं अविचारानें युद्ध करून मृत्यु पावला तें. १५ त्या युद्धांत मराठे सरदार कोण कोण होते व त्यांणीं आपलें लष्कर वांचवून विजापूरकरांच्या लष्कराचा पराभव केला, आणि शिवाजीनें त्यांचा संमान केला. १६ शिवाजीला राज्याभिषेक झाला, व शिवाजीनें सुवर्णतुला केली तें. १७ त्याणें मोंगललोकांशीं तह केलेला मोडला. १८ शिवाजीनें कितीएक नवे किल्ले बांधिले, व त्या शिवाजीचे शरीरीं सातार्‍यामध्यें समाधान नाहीं असें झालें.

## भाग नववा

सन सोळाशें सत्याहत्तरांपासून सोळाशें ऐंशी पर्यंत.

१ शिवाजी करनाटक प्रांत घ्यावयास गेला तो प्रकार, व तो शिवाजी तिकडे जातांना वाटेनें देवस्थान पाहून तपश्चर्या करावयास गेला. २ त्याणें करनाटकीं जाऊन युद्ध कोणें प्रकारें केलें तें, आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकोजी याशीं बोलणें झालें तो प्रकार. ३ मोंगल आणि विजापूरकर यांणीं मिळून गोंवळकोंडेकर यांचें राज्य बुडवायास सैन्य पाठविलें, परंतु तें कार्य शेवटास गेलें नाहीं; अबदुलकरिमाचा मृत्यु, आणि त्याचे जागीं मसाउदखानाची स्थापना. ४ व्यंकोजी शिवाजीच्या लष्करावर छापा घालून आपणच प

राभव पावला तो प्रकार. ५ जनार्दनपंतहंबीरराव व मोरोपंत यांणीं युद्धें कशीं केलीं. ६ सुलतान माऊम यास दक्षिणेचा अधिकार मातक्यान दिला तें वर्तमान. ७ मोंगलांचें लश्कर विजापूर घ्यावयास आलें ह्मणून मसाउदखानानें शिवाजीपाशी कुमक मागितली; व तो शिवाजी मोगलांचे मुलखीं जाऊन उपद्रव करिता झाला, आणि तेथून लूट घेऊन माघारा येत असतां वाटेंत मोंगलांच्या लश्करापासून मोठे संकट पावला; नंतर आपल्या मोठ्या शौर्येंकरून आणि जासुदांचे चातुर्यें करून तो व त्याचें सैन्य वांचलें. ८ संभाजीची वर्तणूक. ९ मोंगलांनीं विजापूरचा घेरा उठविला, नंतर शिवाजीनें विजापूर करांस कुमक केली होती तीपासून तो काय लाभ पावला. १० तेणें करून व्यंकोजी निरुत्साह झाला, यास्तव त्यास शिवाजीनें हितोपदेशार्थ पत्र लिहिलें. ११ त्या शिवाजीचा मृत्यु व त्याचे स्वभावाचें वर्णन. १२ तो मेल्यानंतर तक्ताधिपति कोण कोण झाले तें वर्तमान.

## भाग दाहवा

सन सोळाशें ऐंशी पासून सन सोळाशें एकुण नव्वद पर्यंत.

१ संभाजी राज्य घेत असतां त्याणें काय काय निर्दयपणा केला. २ त्याणें खांदेरीपासून शिद्दीला हांकून घावयाचा उद्योग केला; परंतु तो व्यर्थ गेला. ३ औरंगजेबाचा पुत्र सुलतान महंमद आकबर तो आपल्या संरक्षणार्थ संभाजी जवळ राहिला, मग त्या संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम यास अधिपति करून संभाजीला काढावा असें त्याचे जवळच्या लोकांहीं योजिलें, त्यावरून संभाजीनें कितीएक लोक जिवें मारिले. ४ त्याणें शिद्दीच्या जंजिऱ्यास घेरा

घातला, आणि उठून गेला; मग पोर्तुगीज लोकांशीं युद्ध करूं लागला.

५ त्याचा वज़ीर कलुषा याची [illegible]; पूर्वी शिवाजीचे वेळस जोल ष्करचा बंदोबस्त होता तसा संभाजीचे राज्यांत चालिला नाहीं; त्याचा परिणाम कसा झाला तें प्रकरण. ६ औरंगजेब दक्षिणेस आला त्या वेळेस देशाचा प्रकार काय होता तो. ७ औरंगजेब अहंमदनगरास आला त्यावेळचें त्याचे संपत्तीचें स्वरूप कथन केलें तें प्रकरण. ८ मोंगलांचे लश्करानें काय आचरण केलें तें.

९ विजापूर मोंगलांनीं घेतलें तो प्रकार; त्यावर तें राज्य बुडून शहर ओस पडलें. १० पहिला झालेला सल्ला मोडून गोंवळकोंडें औरंगजेबानें घेतलें, त्यावरून तें राज्य बुडालें. ११ हंबीरराव मराठा सेनापति शिरजीखानास जिंकून आपण मरण पावला तो प्रकार. १२ करनाटकांत काय काय वर्तमान झालें तें.

१३ संभाजी केवळ अयोग्य असें समजून सुलतान महंमद आकबर निघून गेला. १४ नंतर दक्षिण देशाची दुर्दशा झाली तें प्रकरण. १५ इंग्रेजलोकांनीं समुद्रांत उपद्रव केला तो प्रकार.

१६ संभाजी आपल्या वजीरासुद्धां औरंगजेबाचे कैदेंत सांपडला.

१७ त्या दोघांचें मरण

## भाग आकरावा

संन सोळाशें एकुण नवदांपासून संन सत्राशेंसात पर्यंत

१ मराठ्यांनीं रायगडीं मसलत करून संभाजीचा पुत्र शिवाजी तो प्रौढ होई तोंपर्यंत राजाचा सावत्र भाऊ राजाराम तो धनी केला. २ मोंगलांनीं रायगड घेतला, तेथें संभाजीची स्त्री येसुबाई व पुत्र शिवाजी उभयतां सांपडलीं तीं त्यांणीं औरंगजेबा

कडे नेली. ३ राजाराम जिंजीस गेला तेथें त्याणें शिवाजी प्रमाणें अष्टप्रधानादिक करून आपलें माहात्म्य वाढविलें. ४ मोंगलांनीं जिंजीस घेरा घातला; तें काम कांहीं निमित्तानें राहिलें. ५ मराठे मोंगलांच्या मुलखीं घांस दाणा घेऊं लागले, तन्निमित्त औरंगजेब ब्रह्मपुरीं जाऊन राहिला. ६ इंग्रेजलोक व पोर्तुगीस लोक यांचें कांहीं वर्तमान. ७ संताजी व धनाजी ऊभयतां करनाटकांत जाऊन मोंगलांशीं युद्ध करून जय पावले. ८ मोंगलांच्या सरदारांस जिंजी घेणें अवश्यक पडलें, ह्मणून त्याणें राजारामास काढून लाविलें आणि जिंजी घेतली. ९ मराठ्यांनीं साताऱ्याची राजधानी केली. १० राजारामाच्या अष्टप्रधानांत कांहीं बदली झाली. ११ कान्होजी आंग्रे व शिधोर्जी गुजर यांची गोष्ट. १२ संताजी घोरपडा कोणेंप्रकारें मरण पावला तें प्रकरण. १३ राजाराम मोठें लश्कर जमा करून खानदेशांत व वराडांत खंडणी घेऊं लागला. १४ औरंगजेबानें करनाटकांतून जुलफिकारखान बोलावून आणून राजारामाचे पाठीस लाविला. १५ औरंगजेब फौजेसुद्धां साताऱ्यास आला त्याणें युद्ध करून किल्ला घेतला. १६ राजाराम याचा मृत्यु. १७ त्याची स्त्री ताराबाई तिणें राज्य चालविलें. १८ मराठ्यांचें प्राबल्य व मोंगलांची बलहीनता; मराठे लोक कोण कोणत्या कारणासाठीं एकचित्तें करून वागत गेले तें प्रकरण. १९ औरंगजेब विजापूरीं येऊन मग त्याणें वांकिणकेरा गांवास घेरा घातला ती गोष्ट. २० मोंगलांनीं घेतलेले किल्ले मराठ्यांहीं लढून माघारे घेतले. २१ औरंगजेब अहंमदनगरीं येऊन मृत्यु पावला.

# भाग बारावा

संन सत्राशें सातां पासून संन सत्राशें वीस पर्यंत.

१ शाहूला शाहू असें नाव कोणें प्रकारें प्राप्त झालें तें प्रकरण. २ तो शाहू दिल्लींतून सुटून आपल्या राज्यावर आला ते समयीं ताराबाईनें तो खोटा ह्मटला ह्मणून युद्ध झालें; अक्कलकोटच्या राजाची मूळपीठिका. ३ बाळाजी विश्वनाथ याचा उद्भव. ४ मोंगल लोक व शाहू यांची वर्तणूक. ५ धनाजी जाधव याचा मृत्यु. ६ ताराबाईनें पन्हाळा किल्ला घेतला, आणि कोल्हापुराची राजधानी करून तेथें राहिली; ताराबाईचा पुत्र शिवाजी याचा मृत्यु; संभाजी राजा होऊन ताराबाई बंदीस पडली. ७ चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांचा वाद होऊन जींजीं वर्तमानें झालीं तें. ८ निजामउलमुलुख याची गोष्ट. ९ मोंगल व मराठे यांचें युद्ध. १० मराठेलोक यांमध्यें फार अव्यवस्था झाली. ११ कान्होजी आंग्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव केला. १२ नंतर बाळाजी विश्वनाथानें कान्होजीशीं तह केला, तेणें करून मराठ्यांस हित होईल असें जाणून शाहूनें बाळाजीला पेशवाई दिली. १३ मग तो पुरंदरचें आधिपत्य पावला. १४ नंतर मराठ्यांची कांहीं व्यवस्था दिसूं लागली तो तपशील. १५ शाहूचे स्वभावाचें निरूपण. १६ फेरुकशेर बादशाहानें मराठे लोक आपणास अनुकूळ व्हावयाचा उद्योग केला तो पर्याय. १७ त्याणें सैयद हुसेन अली खानाशीं कृत्रिम केलें तो विस्तार. १८ शाहू व सैयद हुसे यांशीं तह होऊन सैयद दिल्लीस गेला, आणि फेरुकशेरास पदच्युत करून दुसरा बादशाह स्थापिला. १९ बाळाजी विश्वना-

थ चौथ व सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा घेऊन साताऱ्या स आला. २० नंतर मराठेलोक स्वराज्यांतील वसूल जमाकरूं लागले तो प्रकार.

# भाग तेरावा

संन सत्राशें विसांपासून संनसत्रांशें सव्वीसपर्यंत.

१ निजामउलमुलुखानें सैयदाचे आज्ञेंत वागणें सोडून मनांत दक्षिण घ्यावयाचा निश्चय केला. २ त्यांनतर तो सैयदाच्या सरदाराशीं युद्ध करून जय पावला. ३ सैयदहुसेनअल्लीखान आपल्या बादशाहासहित निजामउलमुलखाच्यापारिपत्यास दिल्लीहून निघाला, तो वाटेनें शत्रूच्या मारेकऱ्यांनीं मारिला. ४ दुसरा सैयद आबदुलखान तो निजामउलमुलुखाशीं युद्ध करीत असतां पराभव पावून त्याचे कैदेंत सांपडला; त्यावरून दिल्लीमध्यें लोकांनीं बादशाहाचे प्रसन्नते साठीं मोठा उत्साह केला. ५ परशुरत्रिंबक व बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे यांच्या मरणामुळें मराठी दरबारांत काय काय वर्तलें तें. ६ बडोदेकर गाइकवाड यांचा मूळपुरुष दमाजी गाइकवाड याचे मरणाचा प्रकार. ७ निजामउलमुलुख यास बादशाहानें वश करून आपली वजीरी दिली असतां तेथील दरबारी लोकांनीं त्याच्या नाशाचा उद्योग केला आणि गुजराथेचा अधिकारी हैदरकुलीखान याच्या नाशाविषयीं निजामउलमुलुखास बादशाहानें गुप्तपणें आज्ञा केली; यावर तो निजामउलमुलुखाचे हातून पराभव पावला; मग बादशाहानें निजामउलमुलुखास वकीलसुतलख नामें मोठी पदवी दिली. ८ बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाजीराव याचें वागणें व होळ

कर व शिंदे यांची उत्पत्ति;व दमाजी पंवाराची वर्तणूक. ९ बाजीराव बाळाजी विश्वनाथाचा पुत्र याणें काय काय मसलत केली तें;व तिचा प्रतिपक्षी श्रीपतराव झाला तें प्रकरण. १० शकरखेरा जंवळचे लढाईचा प्रकार. ११ सुरतेचा अधिकारी रुस्तुमअली तो पिलाजी गाइकवाडाचे फितुरानें मेला गेला. १२ अमदाबादचा अधिकारी आमेदखान तो कांताजी व पिलाजी यांस चौथ देता झाला,तो ऐवज जमा करिते समयीं त्या उभयतांचा कलह होऊन कांताजीचा विभाग मायी नदीचे वायव्येस ठरला, व आग्नेयीकडचा विभाग पिलाजीचा ठरला. १३ अमदाबादेस शाहा बागेजवळ लढाई झाली तें. १४ गुजराथचे व्यवस्थेचा प्रकार;व बाजिरावानें माळव्या मुलखीं स्वारी घातली.

## भाग-चवदावा

संन सत्राशें सत्ताविसांपासून संन सत्राशें चौतीसपर्यंत.

१ निजामउलमुलुखानें आपलें बळ वाढवाया करितां मराठी सरदार लोकांत कलह उत्पन्न व्हावा ह्मणून कायकाय उद्योग केला तें प्रकरण. २ त्याणें प्रतिनिधीच्या योगें शाहूशीं तह करून हैदराबादचे चवथाईची सोड चिठ्ठी घेतली. ३ तो तह पेशव्यांचे मनास आला नाहीं. ४ निजामउलमुलुखानें शाहू आणि संभाजी या उभयतां बधूंत वैमनस्य पडावयाचा यत्न केला तो पेशव्यांनीं व्यर्थ पाडिला. ५ त्यावरून पेशवे व निजामउलमुलुख यांचें युद्ध झालें. ६ नंतर तो निजामउलमुलुख याचा बाजीराव पेशवे यांच्या शाहाणपणापुढें उपाय चालेना ह्मणून तहाचें बोलणें करूं लागला. ७ बाजीराव गुजराथची चौथ व सरदेशमु

खी यांची सनद पावला. ८ कोल्हापुरचा राजा संभाजी व प्रतिनिधि या उभयतांचें युद्ध होऊन संभाजी पराभव पावला. ९ पेशवे बाजीराव व सेनापति दाभाडे या दोघांचें युद्ध झालें, त्यांत बाजिरायाचा जय होऊन दाभाडा मृत्यु पावला. १० निजामउलमुलखाची वर्तणूक. ११ गुजराथ मुलखांत पिलाजी गाइकवाड व जोतपूरचा राजा आभीशिंग यांचा युद्धप्रसंग घडला १२ त्यापुढें आभीशिंगानें पिलाजीशीं तहकरावयाचे निमित्तें करून मारेकरी पाठवून त्यास मारिलें. १३ बुंदलखंड मुलखीं राजा चतुरसाल याणें पेशव्यास कुमकेस घेऊन मोंगलांस बुंदलखंडांतून पार केलें, यास्तव त्याणें बाजीरावाला कांहीं मुलूख बक्षीस दिला. १४ राजा जयशिंगयास माळव्याचें आधिपत्य प्राप्त झालें तें त्याणें बाजीरावास दिलें.

## भाग पंधरावा

संन सत्रांशें चवतीसांपासून सत्रांशें चाळीसपर्यंत.

१ मराठीलोकांची वर्तणूक. २ रघूजी भोंसल्यास सेनासाहेबसुभा पदवी प्राप्त झाली. ३ वाडीचे सावंत व आंग्या व शिद्दी यांचें वर्तमान. ४ बाजीराव पेशवा माळव्या मुलखांतून माघारा आला तें वृत्त. ५ मल्हारजी होळकर याणें मुलखांत स्वाऱ्या घातल्या तें प्रकरण. ६ बाजीरावास खर्चाची अडचण पडली यास्तव त्याणें बादशाह याशीं तह करून माळव्या मुलखीं कांहीं अधिकार मिळविला, त्या शिवाय त्यास दक्षिणेंत ही सरदेशपांडेपणा मिळाला. ७ दिल्लीच्या बादशाहानें निजामउलमुलख आपणास वश व्हावा ह्मणून उद्योग केला तो विस्तार. ८ मोंगल व बाजीराव या दोहीं पक्षीं युद्धाची सिद्धता झाली, तेव्हां निजामउल

[stamp]

मुलुखानें मोंगलांचा पक्ष स्वीकारिला. ९ बाजिरावानें पराक्रमें करून दिल्लीच्या दरवाज्या पर्यंत प्रवेश केला तो प्रकार. १० आंग्र्याची हकीगत. ११ बाजिरावानें निजामउल्मुलुखाच्या लश्करास भोपाळाजवळ घेरा घालून असा उपद्रव केला कीं, त्यास याशीं तह करावा लागला. १२ पोर्तुगीसलोक व इंग्रेजलोक यांची वर्तणूक. १३ पेशवे व रघूजीभोंसले यांचे युद्ध झालें तें. १४ दिल्लीमध्यें फारशीमुलखाचा नादरशाहनामा बादशाह आला त्यामुळें मोंगललोक संकट पावले तें प्रकरण; मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारे देऊन आपण आपले मुलखीं गेला. १५ मराठ्यांनीं वसई किल्ल्यास घेरा घातला ती कथा. १६ पेशव्यांनीं दक्षिण घेतल्याचे पूर्वीं माळवा व बुंदेलखंड या दोहों मुलखीं काय काय बंदोबस्त केला तो प्रकार. १७ पेशवा हिंदुस्थानांत संचार करूं लागला. १८ मराठ्यांनीं संभाजीआंग्र्यावर कांहीं मसलत केली होती ती बाजिरावाच्या मरणामुळें सिद्धीस न गेली. १९ हिंदुस्थान व दक्षिणदेश आदिकरून सर्व मुलखांच्या राज्यांचीं वर्तमानें. २० बाजिरावाच्या स्वभावाचें स्वरूप कथन; व त्याचे पुत्र बाळाजी बाजीराव व रघुनाथराव व जनार्दनबाबा व समशेरबहादुर यांची गोष्ट.

## भाग सोळावा

संनसत्राशें चाळिसांपासून सत्राशें एकुणपन्नास पर्यंत.

१ करनाटकांत मराठ्यांचा प्रवेश. २ रघूजी भोंसला याणें बाळाजीबाजीराव यास पेशवाई नमिळावी ह्मणून राजाजवळ उद्योग केला तो शेवटास न गेला. ३ चिमणाजी

आपा याचा मृत्यु. ४ पेशवा राजापासून मोठ्या लाभाची सनद पावला. ५ भास्करपंत बंगाल्यांत शिरला. ६ दमाजीगाइकवाडानें माळव्यांत स्वांऱ्या घातल्या. ७ अल्लीवेरदीखानानें भास्करपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर रघूजी भोंसला याणें स्वयें स्वारी केली. ८ तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें पेशव्यांस माळव्याचा अधिकार व इतरलाभाची आशा दाखविली, यास्तव त्याणें अल्लीवेरदीखानाचा पक्ष स्वीकारून रघूजीला तेथून घालविलें. ९ मग पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावून साताऱ्यास आला. १० त्यापुढें रघूजी भोंसले आणि बाळाजीबाजीराव पेशवे यांची कांहीं समजूत पडली. ११ निजामउल्मुलुख याची कांहीं गोष्ट. १२ रघूजीचा भास्करपंत व मोठे मोठे मानकरी मराठे सरदार पुनः बंगाल्यांत गेले ते अल्लीवेरदीखानाच्या कपटानें घातें करून मारिले गेले. १३ आफगाणांचा बादशाह आमेदशाह अब्दाली याची गोष्ट; दिल्लीचे बादशाहाचा मृत्यु, आणि त्याच्या पुत्राचें स्थापन; निजामउल्मुलुखाचा मृत्यु. १४ नाशिरजंग मोठें सैन्य घेऊन करनाटकास चालिला. १५ राजाराम राजा कसा प्रकट झाला तें प्रकरण. १६ त्यानंतर साताऱ्यास सकवारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक झाली तें १७ बाळाजीनें सकवारबाई कोणे प्रकारें सती घालविली तो विस्तार.

## भाग सत्रावा

संन सत्राशें पन्नासांपासून सत्राशें छप्पन्न पर्यंत.

१ पेशव्यानें रघूजी भोंसला व इतर सरदार वश केले. २ पुणेशहर मराठे लोक यांची राजधानी झाली. ३ बाळाजी

पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला; त्याचें कारण रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव. ४ पेशव्यानें गाजीवद्दिन निजामउल्मुल्कखाचा वडीलपुत्र त्याचा पक्ष अंगीकारिला. ५ फ्रांशीसलोकांनीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजामपदवी दिली; नंतर मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजामपदवीचा लाभ. ६ पेशवा गाजिवद्दिनाच्या कामासाठीं कृष्णें पर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाइकवाड यांच्या कृत्रिमामुळें माघारा आला; आणि राजाराम मोठया अडचणीनें बंदींत पडला. ७ सलाबतजंग फ्रांशीसलोकांच्या आश्रयेंकरून गांवें लुटीत पुण्याकडे गेला. ८ रघूजी भोंसल्यानें कायकाय संपादन केलें ते प्रकरण; व मीरहबीब याचा मृत्यु. ९ दिल्लीकडील कांहीं वर्तमान; व मराठे त्या कामांत शिरले तो विस्तार. १० गाजीवद्दिन शिंदा व होळकर यांच्या आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला; तो आपली निजामपदवी पावेल असें सिध्ध झालें असतां आपण मृत्यु पावला. ११ सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर त्याणें पेशव्यास कायकाय दिलें तो प्रकार. १२ पेशव्यानें करनाटकीं स्वांरी केली. १३ पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला. तो तें कार्यकरून हिंदुस्थानांत गेला. १४ रघूजी भोंसल्याचा मृत्यु, व त्याच्या चौघां पुत्रांची गोष्ट. १५ पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा. १६ दिल्लीकडचें कांहीं वर्तमान; दिल्लीचा आमेदशाह बादशाह याचे गाजीवद्दिनाच्या पुत्रानें डोळे काढून त्यास कैदेंत ठेविलें; आणि जानदारशाह ह्मणून पूर्वीचा बादशाह त्याचा नातू तक्ताधिपतिकेला. १७ बाळाजी बाजीराव पेशवा याच्या स्वभावाचें वर्णन. १८ पे

शग्यानें आंग्र्याचा मुलूख घ्यावया विषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून तें काम झाल्याचे पूर्वीच त्याला सावनूर घ्यावया करितां तिकडे जावयाचें अगत्य पडलें. १९ इंग्रेजांचीं लढाऊ जाहजें जाऊन सुवर्ण दुर्ग किल्ला घेतला; तो मराठ्यांस सोंपविला. २० मराठे यांणीं आंग्र्याचा मुलूख व किल्ले घेऊन विजयदुर्गास घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन त्यांहीं मराठेलोक आपल्या लोकांत नघेतां तो किल्ला घेतला. २१ मराठे लोक जाऊन यांणीं सावनूर किल्ला घेतला; फ्रांशीसलोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली ती बसीच्या युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं. २२ पुण्यामध्यें पेशवे आणि मुंबईचे इंग्रेज यांची समजूत झाली तो प्रकार.

# मराठ्यांची बखर

## पूर्वार्ध

## भाग पहिला

१ पूर्वी मुसलमान लोकांनी हिंदुस्थान घेत त्याचे अगोदर ते उगीच स्वाऱ्या घालून तें लुटीत असत, ते सन अकराशांच्या सुमारें अटक नदीस येऊन पोंचले.

२ त्या पुढें तीनशें वर्षानंतर, अल्लाउद्दीन खिलजी या नामें कोणी एक मोठा मुसलमान सरदार झाला, त्याणें आठ हजार सैन्य घेऊन नर्मदा उतरून खानदेशांतून अकस्मात् देवगडासमोर येऊन डेरा दिला. त्या वेळेस कोणी एक मराठा रामदेवराव जाधव ह्मणून त्या किल्ल्याचा राजा होता, त्याणें आपलें संस्थान राखावयासाठीं कांहीं युद्ध केलें. आणि परतला; मग किल्ल्यांत जाऊन अल्लाउद्दीनाशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां बहूत द्रव्य दिल्यास तो आपला मुलूख सोडून जातो, असें ठरलें. इतक्यांत रामदेवरावाचा पुत्र मुलखांतून फौज जमा करून घेऊन आला, आणि बापानें ठरविलेला तह नमानितां अल्लाउद्दीनाशीं युद्ध करूं लागला. त्या प्रसंगीं राजपुत्राचा पराभव झाला; त्यामुळें ते मुसलमान लोक गर्वे करून उन्मत्त झाले; या स्तव राजास आपलें सर्व द्रव्य आणि इलिचपूर द्यावें लागलें. तेव्हां ते मुसलमान लोक किल्ला सोडून निघाले, तेणें करून अल्लाउद्दीन मोठा विख्यात झाला; आणखी त्याला दिल्लीचें तक्त सहज

आम झालें.

३ मग त्याणें दक्षिणदेशीं तीन वेळां फौज पाठविली, त्या योगें करून बहुतेक दक्षिणदेश व तेलिंगण त्याचे हस्तगत झालें; आणि त्या लष्कराचे उपद्रवानें नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत मुलखाची मोठी हैराणगत झाली. पुढें अल्लाउद्दीनानें बहुत दिवस राज्य केलें; शेवटीं त्याच्या राज्यांत जागोजाग बंडें उत्पन्न झालीं; आणि तो मेल्यानंतर दिल्लीचे दरबारी लोकांत कितीएक वर्षें वैमनस्य पडत गेलें. अशा संधीन हिंदू लोकांस पुनः आपलें राज्य स्थापावयास फावलें. ते एका देवगडावांचून सर्व दक्षिणेंत संचार करूं लागले, आणि देवगडासही घेरा घालून लढूं लागले. तेव्हां दिल्लीमध्यें मुबारीकनामें बादशाह होता, तो सैन्य घेऊन आला. तेसमयीं जे लोक किल्ला सभोंवता वेष्टून युद्ध करीत होते ते बादशाहाशीं युद्ध न करितां पळूं लागले. त्यांचे पाठीस बादशाह लागला, तेव्हां एक हरपाळदेव राजा सांपडला, त्याच्या आंगाचें कातडें काढविलें, तेणें करून तो मृत्यु पावला. मुबारिकानंतर दिल्लींत तघलखनामें बादशाह झाला, त्याचें राज्य असतां सन तेराशें तेविसांत दक्षिणदेशीं पुनः बंड उत्पन्न झालें; तें मोडावयास त्याचा पुत्र जो युनास् तो सैन्यसुद्धां येऊन त्याणें तें बंड मोडिलें, आणि तेलिंगणांतील वारंगूळनामें राजधानी घेतली; तेवेळेस त्यानगरचे कितीएक मोठे मोठे गृहस्थ परागंदा झाले. नंतर बारा वर्षांनीं त्यांतील दोघां गृहस्थांनीं तुंगभद्रेचे तीरीं विजयानामें एक नवीच नगरी वसविली; तिची कांहीं काळेंकरून कोणी एका मोठ्या राजानें राजधानी केली. मग ज्याणें एवढा मोठा पराक्रम के-

ला, असा जो युनास त्याला संन तेराशें पंचविसांत राज्याभिषेक करून दिल्लीचे तक्तावर बसविलें, आणि त्यानें नाव महंमद तघलख असें ठेविलें. तो बहूत विद्यांत निपुण असे, परंतु उतावळा, अविचारी, निर्दय, ह्मणून राज्यास अयोग्य होता. तो राज्य करूं लागल्यापासून दोन वर्षांनीं मोंगल लोक मोठी फोज घेऊन दिल्लीचे दरवाज्याजवळ येऊन पोंचले; तेव्हां बादशाहानें त्यांस बहूत द्रव्य देऊन फिरविलें. नंतर तें द्रव्य जितकें खर्चलें होतें तितकें उत्पन्न करावयाकरितां, धूरसमुद्र* नामें एक नगर व करनाटक लुटून द्रव्य आणिलें; तरी त्याला पुरेसें झालें नाहीं. यास्तव नाना प्रकारें प्रजेस पीडा करूं लागला. तो प्रकार असा कीं, तांब्याचे पत्र्यांवर शिक्का करून ते रुपयांच्या किमतीनें चालविले, आणि देवगडाचें नाव दौलताबाद ठेवून दिल्लींत राहणारे लोकांस सांगितलें कीं, तुह्मी सर्वांनीं दौलताबादेस जाऊन राहावें; असें सांगितल्याप्रमाणें त्या लोकांस वर्तविलें; तेणेंकरून त्यांस बहूत कष्ट झाले, आणि दिल्ली ओस पडली.

४ त्यानंतर त्याचे राज्यांत कितीएक जागीं बंडें उत्पन्न झालीं. तीं अशीं कीं, तो बादशाह एक बंड मोडी तों त्याला दुसरे बंडाचें वर्तमान कळे असें होऊं लागलें. शेवटीं अफगाण लोक व उत्तरेकडचे लोक, हा धणी योग्य नव्हे असें जाणून राज्यांत आपणच सत्ता करूं लागले; यास्तव बादशाहानें फौज उत्तरेकडे दूर योजिली. त्या संधींत, जो पूर्वीं मुसलमानांनीं जिंकि-

---

* कोणी ह्मणतात कीं, धूरसमुद्र नगर करनाटकचे बळदेवाची राजधानी. कोणी ह्मणतात कीं, तुळबायाचे बंदरचें मोठें शहर होतें; परंतु आतां त्याचा ठिकाणा नाहीं.

लेला तेलिंगणच्या वारंगूळ नगरचा राजा, तो मुलखांतून फौज घेऊन आला, आणि मुसलमानलोकांशीं मोठ्या युक्तीनें युद्ध करूं लागला. तेवेळेस बादशाह संपूर्ण दक्षिणेच्या बंदोबस्तास मोठी फौज धरूं लागला. इतक्यांत असें मोठें बंड उत्पन्न झालें कीं, नर्मदेचे दक्षिणेस जितकीं मुसलमान लोकांचीं वेगळीं वेगळीं संस्थानें झाळीं तितक्यांचें कारण तें बंड. त्या बंडाचें मूळ असें आहे कीं, पूर्वीं गुजराथी लोकांनीं कांहीं बंड केलें, तें बादशाहानें मोडिलें, तेव्हां ते लोक बादशाहाचे भयानें पळाले ते दौलताबादकरांची पाठ निघाले. यास्तव बादशाहानें दौलताबादकरांस पदच्युत केलें; आणि सेवकांस आज्ञा केली कीं, गुजराथीलोकांस ह्मणावें, तुह्मी निर्भयपणें हुजूर येऊन भेटावें. तें सेवकांनीं सांगितल्यावरून गुजराथीलोक विश्वासानें बादशाहाचे भेटीस जाऊं लागले. तेसमयीं बादशाहा फौजेसहित गुजराथेंत होता ह्मणून ते तिकडे गेले. ते गुजराथे जवळ गेले तों, त्यांस असें वाटलें कीं, बादशाहा आह्मास बोलाऊन नेऊन कांहीं घात करील. याकरितां जे त्यांनां नेणारे बादशाहाचे-लोक त्यांचे बरोबर होते, त्यांस तेथेंच मारून बंडाचा झेंडा लाऊन माघारे दौलताबादेस चालिले. तेव्हां वाटेनें जातांजातां, जे संस्थानीलोक बादशाहापासून त्रास पावले होते, ते त्यांस मिळूं लागले. तें सैन्य असें जमलें कीं, तें दौलताबादेजवळ जातांच त्या किल्ल्यांतल्या लोकांनीं ह्या सैन्यापुढें बादशाहाचें कांहीं चालणार नाहीं, असें जाणून दौलताबादेच्या मुख्य कारभाऱ्यांस कैद केलें, आणि किल्ला बंडवाल्यांस दिला. नंतर त्या बंडाचे लोकांस असें वाटलें कीं, ह्या एवढ्या मोठ्या सैन्यास धनी एक असावा; परंतु तें सैन्य एकाएकीं जमलेलें ह्मणून त्यांत

कोणी राज्य करायास योग्य आहे किंवा नाहीं, हें कोणास कांहीं च समजेना; यास्तव एक इस्मायल नामें एक हजार स्वारांचा सरदार होता, त्याला बादशाहा करून त्याचें नाव नासरुदिन ठेविलें, आणि तो दौलताबादचा तक्ताधिपति केला. हें वर्तमान महंमदशाहा बादशाहास कळतांच, तो फौजेसुद्धां गुजराथेंतून आला. तो दौलताबादेस येतो तोंतेवंडवाले युद्धास सिद्ध होते, ह्मणून त्यांचें व या बादशाहाचें तत्काळ युद्ध झालें. त्या प्रसंगीं दोघांतून एकाचाही जय झाला नाहीं, परंतु महंमदशाहाचें सैन्य ज्याजागीं लढाई झाली त्याच जाग्यावर होतें; आणि नासरुदिनाचे मागें सरलें. तेव्हां त्या बंडवाल्यांनीं असा विचार केला कीं, नासरुदिनानें किल्ल्याचें रक्षण करावें, आणि सरदारांहीं फौजेच्या वेगळ्या वेगळ्या टोल्या करून त्याचे मुलखांत चोंहीकडून शिरावें; आणि मोटी धुमाळी करावी; समोर लढूं नये. मग तसेंच केलें. हें वर्तमान महंमदाला कळतांच, त्याणें दौलताबादेस वेढा घातला. आणि जे सरदार मुलखांत दंगा करावयास जात होते, त्यांत एक जफीरखान नामें मुख्य होता त्याने पाठीमागें एक आपला अंमादउल्मुलुख ब्रीजी नामें मोठा सरदार ठेविला. इकडे सभोंवता वेढा पडल्यामुळें किल्ल्यांतल्या लोकांस अन्नपाणी मिळेनासें झालें. यासाठीं ते असा विचार करूं लागले कीं, आतां युद्ध करूं नये, किल्ला द्यावा. इतक्यांत दिल्लीकडे एक मोठें बंड उत्पन्न झालें, असें वर्तमान महंमदशाहास कळलें; यास्तव किल्ला घ्यावयाचें काम आपले सरदारांस सांगून आपण दिल्लीस गेला. हें वर्तमान दक्षिणी लोकांस कळतांच, ते चोंहींकडून आले, आणि जे बादशाहाचे सरदार किल्ल्याशीं लढत होते त्यांस नाना प्रकारें उपद्रव करूं लागले.

तेव्हां त्यांस असें भय झालें कीं, किल्ला सोडून लवकर नर्मदाउतरून पार जावें, ह्मणून पळूं लागले. तेव्हां दक्षिणी लोक त्यांचे पाठीस लागले, यास्तव त्यांना वाटेनें दक्षिणी लोकांचा उपद्रव बहूत लागला; परंतु ते तसाच सोशीत सोशीत नर्मदा पार झाले. इकडे जफीरखान पळत होता तो हें आनंदाचें वर्तमान ऐकून पाठीस लागलेल्या अंमादउल्मुलुखावर माघारा उलटला; तेव्हां तो आपले फौजेसहित बेदराजवळ ठाणें धरून राहिला. जफीरखान मोठा विचारवंत होता, त्याणें शत्रूशीं तत्काळ युद्ध न केलें; त्याचे बरोबरीचा आकार मात्र दाखविला. त्याच्या अशाआचरणानें तेलिंगणचे राजास मोठा भरंवसा वाटला; ह्मणून त्याणें त्याचे कुमकेस पंधरा हजार फौज पाठविली; आणि दौलताबादेहून पांच हजार आली; आणि त्याची वीस हजार होती; अशी चाळीस हजार फौज झाली; तेव्हां तो अंमादउल्मुलुखाशीं लढूं लागला. ती लढाई फार मोठी झाली; त्यांत अंमादउल्मुलुख पडला; आणीक त्याची फौज बहूत नाश पावली. मग तो मुलखांत जागोजाग ठाणीं घालून आपण फौजेसहित दौलताबादेस आला. त्यावेळेस नासरूदीन बादशाहानें, हा आपणापेक्षां मोठा पराक्रमी आणि विख्यात, असें जाणून किल्ल्यांतून बाहेर आपण त्याला सामोरा आला, आणि भेटला. मग सर्व मानकरी लोकांस ह्मणाला कीं, मजपेक्षां हा बहूत योग्य आहे, याला तख्ताचा अधिकारी करावें. अशी बादशाहाची आज्ञा होतांच त्या सर्वांहीं अवश्य ह्मणून नासरूदिनाचे जागीं जफीरखानास बसविलें. त्याचें नाव सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी असें ठेविलें.

५ ब्राह्मणी नाव ठेवण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वी

दिल्लीमध्यें एक कांगो नामें ब्राह्मण होता, त्याणें जफीरखा नास त्याचे बाळपणांत विकत घेऊन आपल्या घरचें कामा करितां बाळगलें होतें. नंतर कांहीं दिवसांनीं हा उत्तम गुणी असें जाणून कांहीं द्रव्य न घेतां त्यास ब्राह्मणानें सूट दिली; आणि त्यास आपलें कांहीं द्रव्य देऊन संतोषें करून बोलिला कीं, तुला लक्ष्मी प्रसन्न असो. असे त्याचे उपकार व आशीर्वाद स्मरून जफीरखानानें आपल्या नावास कांगोब्राह्मणी अशीं अक्षरें लाविलीं; आणखी त्या ब्राह्मणास बलावून आणून त्यास आपल्या जामदारखान्याचें काम सांगितलें; आणि आपणापासून पुढें जे आपले पुरुष झाले त्यांचें ही नाव कांगो असें चालविलें*

६ असा त्याणें त्या ब्राह्मणाचा मान केला, हें वर्तमान संन तेराशें सत्तेचाळिसांत झालें. ते वेळेस महंमद तघलखनामें दिल्लीचा बादशाहा मेला; तेणेंकरून जफीरखानाचें राज्य निर्बाध चालूं लागलें, त्यांत जे जे बादशाह झाले, ते ते आपणास ब्राह्मणीवंश ह्मणवीत असत. सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी बादशाह झाला ते समयीं, दक्षिणेंत हिंदूलोकांचीं कितीएक संस्थानें होतीं त्यांतून कितीएक संस्थानी लोकांनीं आपलीं संस्थानें स्वसंतोषें त्यास दिलीं, आणि कितीएक त्याणें बलात्कारें करून घेतलीं. मग जीं घ्यावयास फार कठीण तींमात्र राहिलीं. नंतर त्याणें लोकरंजनार्थ कितीएकांस इना

* ही हकीगत फिरिश्त नामें कोणी मुसलमानांचें वृत्त लिहिणारा होता, त्याचे बखरींतून काढून घेतली. ही खरी आहे असें भासतें, कां कीं, जितके ब्राह्मण, मुसलमानांचें कांगो नामें देशपांडेपणासारखें पद आहे त्या अधिकाराचे आहेत तितक्यांस अ-

म जमीनी दिल्या; कितीएकांस देशमुख्या व पाटिलक्या दिल्या; कितीएक सरदारांस जहागिरी देऊन फोजे सहित चाकरीस ठेविलें. याप्रमाणें त्याणें लोकप्रीति संपादिली; आणि आपले राज्याचे बळकटीसाठीं कितीएक मुसलमान लोकांस मोठमोठ्या जहागिरी देऊन हिंदूलोकांनीं मुसलमानांचें आज्ञेंत वागावें असें केलें. त्या वेळेस बहुतेक दक्षिणदेश व कोंकणपटी त्यांणीं घेतली; परंतु दाभोळेपासून रामसपर्यंत कोंकण, व घाटमाथां पुरंदर डोंगर हरणकाशी पावेतों बहुतेक त्यांचे स्वाधीन झालें नाहीं. अशीं सत्तर वर्षे गेलीं, नंतर तेंही घेतलें. सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी बादशाहा दाहा वर्षे होता, नंतर मेला. त्याचे जागीं त्याचा पुत्र महंमदशाह ब्राह्मणी स्थापिला, तो सन तेराशें सत्तावन्नांत राज्य करूं लागला. नंतर एकवर्षानें तो सैन्य घेऊन मुलूख घ्यावयास करनाटकांत गेला, तेसमयीं दौलताबादेंत सैन्य बहुत नव्हतें; आणि असें वर्तमान आलें कीं, बादशाहा करनाटकांत मेला. तें ऐकून मुसलमानांतील एक बहिरामखान मजेंदराणी नामें सरदार होता त्याणें कोणीएक मराठा जाधव याचे मसलतीनें मोठें बंड उत्पन्न केलें. त्यापूर्वी अकरा वर्षे मुसलमानांचे राज्यांत बंड नव्हतें. हें बंडाचें वर्तमान बादशाहास करनाटकांत कळलें, तेव्हां तो बहिरामखान, बादशाहाचे जातीचा मुसलमान, यास्तव बादशाहानें त्याला बहुत युक्तीनें सांगून पाठविलें; निकरानें निरोप पाठविला नाहीं. परंतु मराठीलोकांचे सहायास्तव त्याला तें ऐकतां येईनासें झालें; आणि पेठणाजवळ एक बादशाहाचा मोठा सरदार होता, तेथें फोजेसहित जाऊन युद्ध करूं लागला;

आणि त्यापासून पराभव पावला. याखेरीज ब्राह्मणीवंशबाद शाहाचे राज्यांत दुसरें बंड झालें नाहीं. त्यांत मराठीलोकही सुखी असतील.

७ यानंतर संन तेराशें शाण्णवांचे सालीं एक मोठा दुष्काळ पडला, तो इतरां दुष्काळां प्रमाणें नव्हता ह्मणून त्याचें नाव दुर्गादेवी असें ठेविलें, तो बारा वर्षें होता.

८ नंतर समयीं पाउस पडूं लागला, परंतु बहूत दिवस दुष्काळ होता ह्मणून मुलूख व प्रांत ओस पडले होते. याज करितां त्या दुष्काळानंतर तीस वर्षेंपर्यंत वसूल अगदीं थोडा येत होता. याशिवाय जे किल्ले मुसलमानांनीं घेतले होते ते पाळेगारांनीं बळकाविले, आणि तेप्रदेशेस नाना प्रकारें दुःख देऊं लागले.

९ त्याचा सुमार संन चौदाशें एकुणतीस, त्यावेळेस सुलतान आमेदशाह ब्राह्मणी नामें बादशाहा होता, त्याणें तें बंड मोडिलें; आणि लोकांस सुख व्हावें ह्मणून बंदोबस्तासाठीं एक सैन्य सिद्ध करून पाठविलें; त्याचा मुखत्यार मलिख उलटीज़ार नामें एक सरदार करून पाठविला; त्याज बराबर एक मोठा शाहाणा ब्राह्मण दादू नरसू काळे या नामें पाठविला. ते कोणी पाटील व देशमूख व देशपांड्या आढळला असतां त्याला बरोबर नेऊन त्याचे जागीं त्याला स्थापावा, असें करीत चालिले. तें लश्कर जाऊन त्यांणीं तें बंड मोडून वांई किल्ला घेतला, आणि बेदरास गेले.

१० मुलखांचा बंदोबस्त दादू नरसू काळे याजकडे होता, त्याणें प्रांताचे सीमांचें स्मरण नाहींसें पाहून सर्व हद्दी नव्या केल्या. त्यांत जे देश फार लाहान होते ते वाटविले, आणि लोकांस

पहिल्या वर्षे माफीचा कौल दिला; दुसरे वर्षे बिघ्यास एक तो बरा दाणा घेऊन लोक सुखी केले.

११ इतक्यांत घाटमाथ्याचे रामोशी हे लोकांस उपद्रव करूं लागले, तेव्हां बादशाहास असें वाटलें कीं, सर्व डोंगरी किल्ले घेतल्या वांचून रयतेस सुख होणार नाहीं. यानंतर सुलतान अल्लाउद्दीन बादशाह असतां, त्याचा वजीर मियां मनउल्ला याणें असा मनसोबा केला कीं, सारे सह्याद्रीचे किल्ले व कोंकणपट्टींत जे मुलूख आपल्या हातीं आले नाहींत ते घ्यावे. असा विचार झाल्यावर एक सैन्य नवें सिद्ध करून मलिक उलटीजार यास नेमिलें. त्या लष्कराचा तळ चाकणेजवळ पडला; आणि जुंनराजवळ किल्ला बांधून राहिले, आणि तेथून फौज कोंकणांत पाठवून कितीएक दुष्टराजे जिंकिले.

१२ मग जुंनराहून सैन्यसुद्धां कोंकणांत जाऊन शिरके यांचे किल्ल्यास घेरा घालून तो किल्ला घेऊन मलिक उलटीजारानें राजास व लोकांस आपआपले धर्म सोडून मुसलमानांचे धर्मानें चालावें ह्मणून बहुत आग्रह केला, तेव्हां शिरके जातीचे अस्सल मराठे यांणीं मोठ्या युक्तीनें त्याची आज्ञा न मोडिली असें दाखवून उत्तर दिलें कीं, सिंहगडकर आमचे आप्त आहेत त्यांस जिंकून वर्तवावें, नंतर आह्मी वर्तूं. जर आह्मी एकटेच तुमचे धर्मानें वागूं लागलों, तर ते आमचा मुलूख घेऊन आह्मास जाती निराळे टाकितील. असें ते ह्मणाले यासाठीं तो मुसलमानांचा सरदार सैन्य घेऊन सिंहगड घ्यावयास चालिला, तेसमयीं शिरके यांणीं वाटेंतच रात्रीं छापा घालून त्या सैन्याचा वळून नाश केला, आणि पुनः आपला मुलूख घेऊन पहिल्या प्रमाणें सुखी राहिले. त्यानंतर सोळा वर्षे त्या शिरक्यांचा

मुलूख घ्यावयाविषयीं बादशाहाचे दरबारीं उद्योग झाला नाहीं.

१३ पुढें ब्राह्मणीवंशाचें राज्य बुडत चाललें, तें सन पंधरारों चोविसांत अगदीं बुडालें. असें होण्याचें कारण असें झालें कीं, त्या बादशाहानें सर्व संस्थानें घेऊन आपलें राज्य अमर्याद वाढविलें, त्यामुळें मामलतदारच प्रबळ होऊन त्याची आज्ञा मानीनांत, असें झालें असतां सन चौदारों अठ्याहत्तरांत, कोणी एक मोगल शाहाणा खाजे खान् गावान् प्रधान होता, तो हा सर्व प्रकार पाहून हें राज्य याप्रकारानेंच बुडेल अशी अटकळ करून तें नबुडावें ह्मणून कांहीं बुद्धीचे कल्पनेनें उपायांची योजना करूं लागला. त्यांत पहिल्यानें असें केलें कीं, कितीएक मुलखांच्या तुकड्या नव्या अधिक करून त्या त्या जागीं एक एक शाहाणा माणूस नेमिला. त्या तुकड्यांचा प्रकार असा केला कीं, पहिला कलबुर्ग्याचा मामला एक होता, त्याचे भाग दोन केले; एक विजापूर आणि दुसरा आसनाबाद. दौलताबादेचे भाग दोन केले; एक दौलताबाद आणि दुसरा जुंनर भाग. तेलिंगण जुनें त्याचे दोन केले; एक राजमंडी आणि दुसरा वारंगूळ. वराड जुनें त्याचे दोन केले; एक गावेल आणि दुसरा माहूर. याशिवाय त्याणें आणखी कितीएक बंदोबस्ताचे उपयोगी कल्पना केल्या होत्या, त्या कांहीं दिवस चालल्या, आणि तोही मोठा वाढला. यासाठीं वकुतांचे मनांत विषम वाटून त्यांणीं त्याजवर कांहीं एक निमित्त आणून बादशाहाचे आज्ञेनें त्याला मारिलें. त्या पुढें ब्राह्मणी वंशाची बादशाही सहजच बुडाली.

१४ जे खाजेखान् गावानास मारविणारे त्यांत एक निजामउ-

ल्मुल्क बहिरी ह्मणून होता, त्याचें मूळ असें आहे कीं, तो पाथ्री गांवचे कुळकरण्याचा पुत्र. ज्यावेळेस दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला तेसमयीं तो आपल्या बापा बरोबर करनाटक प्रांतीं गेला होता, तेथें काळक्रमणा करीत असतां, आमेदशाहा वली ब्राह्मणी बादशाहाचें लश्कर आलें, त्या लश्करी लोकांनीं त्याला धरून नेलें. नंतर बादशाहाचे आज्ञेनें त्यास मुसलमान करून बादशाहाचे चाकरीस ठेवून त्याचें नाव मलिख हुसेन ठेविलें. पुढें महंमदशाहाचे राज्यांत त्याला हजार स्वांराची सरदारी दिली. नंतर तो अधिक अधिक योग्यता पावूं लागला असतां, ख्वाजेखान् गावानाचे आश्रयानें त्याला तेलिंगणाची मामलत व या मुलखाच्या ही कितीएक जागा मिळाल्या; आणि निजामउल्मुल्क असें नाव पावला. तो असा कृतघ्न होता कीं, शेवटीं त्याणें आपला संरक्षण करणारा जो ख्वाजेखान गावान त्यास मारिलें.

---

## भागदुसरा.

१ पहिल्या भागांत असें लिहिलें आहे कीं, ब्राह्मणीवंशाचें राज्य सन पंधराशें सवीसपर्यंत बुडालें नव्हतें, परंतु त्यापूर्वीच ज्यांचें नाव ब्राह्मणीवंश नव्हे असे पांच मुसलमान दक्षिणेंत सत्ता करूं लागले होते. त्यांत जो विजापुरीं होता त्याच्या कुळाचें नाव इदिलशाही होतें; गोंवळकोंडे आणि

हैदराबाद हीं दोन्हीं एकच, त्याजागीं जो होता त्याचे कुळानें नाव कुतुभशाही होतें; तिसरा वराडांत होता त्याचे वंशास अंमादशाही ह्मणत; चवथा अहंमदनगरीं असे तो निजामशाही कुळाचा होता; पांचवा अहंमदाबादबेदरचा राहाणारा त्याची बरीदशाही कुळी; असे पांच झाले होते. परंतु अंमादशाही आणि बरीदशाही या दोन्ही कुळ्या थोडक्याच दिवसांनीं बुडाल्या; आणि इदलशाही १ कुतुभशाही २ निजामशाही ३. या तिन्ही राहिल्या. तेसमयीं मराठीलोकांस तेज आलें, त्यायोगें ते स्वतंत्रपणा करूं लागले. दुसरें, पहिले भागांत लिहिलें कीं, संन चौदाशें सत्तेहत्तरांत खाजेखानानें राज्यांतल्या परगण्यांचे नवे नवे अधिक भाग करून त्या त्या जागीं एक एक उत्तम माणूस ठेविला. त्यांत जो दौलताबादेस ठेविला तो आदिलखान् सावीनामें मुसलमान होता, जों पर्यंत खाजेखान् होता तों पर्यंत तो दौलताबादेस होता. नंतर बादशाहानें त्यास विजापुरीं ठेविलें; तेथें सहज कांहीं निमित्तें घडलीं तीं सर्व दैवयोगें त्यास अनुकूळ झालीं. शेवटीं संन चौदाशें एकुण नव्वदांचे साली तो बादशाहाचें पद पावून सर्व राज्याचा अनुभव घेऊं लागला; असें विजापूरचे बादशाहीचें मूळ झालें. त्या दिवसापासून इदिलशाही वंश दक्षिणेंत मोठा विख्यात झाला. अहंमदनगरचे बादशाहीचें मूळ असें झालें कीं, निजामउल्मुल्क बहिरी यानामें खाजेखान् गावान वजीराचा आश्रित होता, त्याणें त्या वजीरास मारवून सुलतानाचें मन प्रसन्न करून घेतलें आणि तो मेल्यानंतर त्याचे पुत्राची वजीरी तो आपण करूं लागला; आणि खाजेखानानें दिलेल्या अ

धिकारीं मलिख आमेद नामें आपला पुत्र स्थापिला, व आण-
खी कितीएक जागा आपल्या पुत्रास देवविल्या, त्यांत जुनर
आणि दौलताबाद येथील परगणे लावून दिले होते. नंतर
निजामउल्मुल्कानें जसा आपला पोषक जो खाजेखान गावा
न् वजीर याचा घात केला, त्याप्रकारेंच दुसऱ्या कोणी दुष्टा
नें त्यास मारविलें. त्यावेळेस त्याचा पुत्र मलिख् आमेद मोठें
बंड उत्पन्न करून आला, आणि बादशाहीआपणकरूंलागला.
त्यासमयीं ब्राह्मणीवंशाचा बादशाह महामुदशाह ब्राह्मणी होता,
त्याणें तें बंड मोडावयाकरितां फार उद्योग केला, परंतु उपाय
चालेना, असा अहंमदनगरचा बादशाहा झाला. आणि त्याचें
नाव निजाम पडलें व त्याला बहिरी ह्मणत होते.* कुतुभ्शाही बादशा-
हीचें मूळ असें आहे कीं, संन चौदाशें पंचाण्णवांत तेलिंगण
ची मामलत कुतुभउल्मुक नामें कोणीएक मुसलमान होता
त्याला सांगितली होती, ती त्याणें सोळावर्षेपर्यंत केली; नंतर
तो संन पंधराशें बारांत गोंवळकोंड्याचे बादशाहाचें तक्त पा
वला, आणि आपलें नाव कुतुप्शाह असें चालविलें. असा
च वराडचा मामलेदार वराडची बादशाही पावला. त्याचें
नाव फतेउला अंमादउल्मुल्क होतें; त्याचें राज्य पंधराशें बा
रापासून पंधराशें चोऱ्याहत्तरांपर्यंत चाललें. त्यानंतर अहंम
दनगरचे बादशाहानें तें राज्य घेतलें. बरीदशाही होती ती

* बहिरी नाव पडावयाचें कारण असें कीं, त्याचा बाप योग्यता पा
वल्याचे पूर्वी बहिरी पक्षी याचें संरक्षण करावयाचें काम पतकरून शिका
रखान्यांत चाकरीस राहिला होता ह्मणून असें नाव पडलें.

अंमादशाहीचे अगोदरच बुडाली. तिचे खालीं बेदर व कलबुर्गी यांचे जवळचा मुलूख होता, तो विजापूरचे बादशाहानें घेतला. याप्रमाणें दोन बुडाल्यावर एक विजापूरची, दुसरी अहंमदनगरची, तिसरी गोंवळकोंड्याची, या तीन राहिल्या. त्यांत विजापूरचे बादशाहीची हद्द, दक्षिणेस निरानदीपासून तुंगभद्रानदी पर्यंत होती; आणि तुंगभद्रेचे दक्षिणतीरीं आंदोणी परगणा व नंदीहाळ शहर होतें, तेंही विजापूरचे बादशाहीखालीं होतें. पश्चिमेस कोंकणपट्टींत बाणकोटापासून रामस पर्यंत मुलूख, मध्येंमध्यें कांहीं कांहीं ठिकाणें सोडून विजापुराकडे होता. पूर्वेकडे रायचूरपरगणा व इदगी परगणा व मलकेर परगणा व बेदर परगणा हे चार परगणे विजापुराकडे होते. याखेरीज पूर्वेकडचे दुसरे परगणे जे राहिले ते गोंवळकोंड्याकडे होते. उत्तरेकडे आंकलकोट व नळदुर्ग व कालीयान व सोलापूर, इतके मुलूख विजापूरचे बादशाही खालीं होते. अहंमदनगरचे बादशाहीखालीं, वराड संबंधीं कितीएक मुलूख व औरंगाबादसुभा व जालने परगणा व खानदेशांतील कितीएक परगणे व बाणकोटापासून वसईपर्यंत कोंकणपट्टी इतके मुलूख अहंमदनगरचे बादशाहीखालीं होते. गोंवळकोंड्याची बादशाही अशी कीं, जिचे पश्चिमेचे आंगीं विजापूरकर व अहंमदनगरकर यांची राज्यें होतीं. त्यांपासून पूर्वेस समुद्रापावेतो मुलूख गोंवळकोंड्याचे बादशाहीकडे होता; परंतु राजमंडी शहर व त्याखालचा मुलूख त्याचे स्वाधीन नव्हता, तेथें दुसरा राजा होता. या तिहीं राज्यांत मुलखांची नांवें ठेवण्याची रीति अशी होती कीं, मोठें सरकार, त्यामध्यें परगणा, त्याचे आंत कर्यात, तिचे पोटीं संमत, तिचे मध्यें महाल,

त्याचे आंत तालूका; याखेरीज हिंदी नावें दोन, प्रांत आणि देश अशीं होतीं. दुसरी राज्यांत अशी रीति होती कीं, लाहान मोठा मामला मखत्यानें सांगावा; कदाचित् कोणी मखता न केला तर बकुत करून हिंदू लोकांस द्यावा. मखत्याचा पैका घेणें व मुलखांत चौकी पाहारा इत्यादि बंदोबस्त ठेवणें व मुलखाचे सीमेसंबंधी खटलें असल्यास त्याची चौकशी करणें, या इतक्या कामांवर बादशाहाचे दरबारांतून एके एकेजागीं आमिल नामें एक एक कारभारी ठेवीत. त्या कारभाऱ्यानें वतनसंबंधी अथवा लोकांचें भाऊबंदकीचें वगैरे दुसरें कांहीं खटलें असल्यास त्याची पंचाईत करून पंचांचे विचारानुरूप करावें, जातीनें मनास आणूनये. विजापूरचे राज्यांत एक मोठा आमिल होता त्याचें नाव मोकासादार ठेविलें असे, आणि दुसरे आमिल त्याचे आज्ञेंत वागतअसत. असे किती एक मोकासादार वीसवीस वर्षे कामावर होते; त्यांत कोणी मेला असतां त्या कामावर त्याचे पुत्रास ठेवावें, अशी चाल होती; कां कीं, मोकासादारांस त्या द्रव्याचा कांहीं विभाग होता. किती एक वेळां एका वर्षांत मोकासादार पहिला दूर करून दुसरा ठेविला असें झालें. आणखीं मोकासादारी निरंतर मुसलमानांसच द्यावी असें नव्हतें, कधीं कधीं हिंदूंसही देत होते. त्या राज्यांत मोकासादारी पेक्षां मोठा अधिकार दुसरा बकुत करून नव्हता. कधीं कधीं सुभा मोठा असे, परंतु सुभ्यानें नेहेमीं त्याप्रांतीं नसावें, बकुधा दरबारींच असावें. त्याणें मुलखाचे वसुलाचें काम न करावें, परंतु त्याचे मुलखाचे दफ्तरावर त्याची सही घ्यावी लागत असे.

२ ब्राह्मणीवंशाचें राज्य बुडाल्यानंतर कांहीं दिवस नवीं नवीं राज्यें झालीं, परंतु मराठीलोकांचे वर्तमानांत अंतर पडलें नाही. त्याचे

ळेचे बखरीवरून असें वाटतें कीं, बहुधा डोंगरी किल्ले मराठे लोकांकडे बादशाहाकडून असत; कधीं कधीं बादशाहाकडेस च असत; कधीं कधीं देशमूख व देशपांडे यांकडे असत. त्यांत कितीएक प्रांतांतील मोठे मोठे किल्ले बादशाहा आपणाजवळच राखी. त्या लोकांत ज्याचे स्वाधीन बहुत स्वार असा जो मोठा सरदार त्याला मोठ्या योग्यतेचें नाव मनसब असें देत होते. तो अधिकार व तें नाव कधीं कधीं हिंदूंस देत, अशी बादशाहाची कृपा हिंदु लोकांवर होती. याशिवाय हिंदूंनीं फौजेसहित आपल्या चाकरीस असावें ह्मणून कितीएक जहागिरी, इनामें, देत असत. त्यानिमित्त चाकरी करितां हिंदू लोकांस बहूत फौज ठेवावी लागत नव्हती. त्यासमयीं फलटणदेशाचा जहागीरदार विजापूरकराकडे होता, त्यापासून बादशाह पन्नास स्वारांची चाकरी घेत असे; आणि मराठी पेशवे यांचे वेळेस त्या जहागीरदारापासून साडेतीनशें स्वारांची चाकरी घेऊं लागले.

३ पेशवे यांचे पूर्वीं इदिलशाही बादशाहींत मराठे लोकांस बर्गे असें नाव मुसलमानांनीं ठेविलें होतें, तें आतां बहूतकरून प्रसिद्ध नाहीं. असें वाटतें कीं, जसें सांप्रत बारभाई नाव हलकें आहे, तसेंच त्यावेळेस बर्गे नाव किमतीस उणें असेल. प्रायः तें नाव करनाटकप्रांतींचे बंड करणारे स्वारांस होतें. त्यांत कोणी मोठे मोठे जहागीरदारही होते, असें असतां सन पंधराशें सत्याहत्तरांत त्या बर्ग्यांतील अधिकारीयांणीं करनाटकांत मोठें बंड उत्पन्न केलें. तेव्हां विजापूरचा इदिलशाह बादशाह याणें तें बंड मोडावयाकरितां लश्कर पाठविलें तें एकवर्षपर्यंत लढलें; परंतु उपाय चालेना, तेसमयीं बादशाहा

नें कोणीएक वासूपंत नामें ब्राह्मण सहाय केला, त्याचे हा तानें त्या बर्ग्यांतील बहुतेक अधिकारी आपल्या हस्तगत करून कपटानें मारिले. यानंतर ते बर्गेलोक विजापूरचा इदिलशाह याचेच आश्रयानें निजामशाह बादशाहाशीं लढूं लागले. बिजापूरकर व अहंमदनगरकर यांचे लश्करांत बहुत करून मराठेलोक फार होते, कांकीं त्यांचीं राज्यें महाराष्ट्रदेशांत होतीं. गोंवळकोंडेकर यांचे लश्करांत मराठेलोक बहुत नव्हते. विजापूरकर व अहंमदनगरकर व गोंवळकोंडेकर या तिघांजवळ मराठेलोक होते,तेपरस्परें युद्धप्रसंग पडला असतां. आपल्या जातीचा लोभ न धरितां लढत असत. भाऊबंदकी संबंधीं द्वेष पडला किंवा बापलेकांत वितुष्ट पडलें असतां भाऊबंद व बापलेक यांणीं परस्परें निकरानें लढावें, अशी एक मराठीलोकांत चाल होती. ती त्यांचे पूर्वीच्या ब्राह्मणीवंशाचे राज्यापासून चालत आली, तिचा प्रतिबंध त्यावेळच्या बादशाहानें केला नाहीं. कांकीं,जे आपल्या जातींत भांडूं लागले ते दुसऱ्याशीं काय लढतात, असें समजून मोडिली नाहीं, तशीच रक्षिली.

विजापूरकर व अहंमदनगरकर यांचे राज्यांत मराठे सरदार कोण कोण होते त्यांचा तपशील मग येईल. आधीं विजापूर व अहंमदनगर व गोंवळकोंडा या तिहीं राज्यांत कितीं बादशाह झाले तो विस्तार, त्यानंतर फिरंगीलोक कोंकणांत आले तें प्रकरण, त्यापुढें मराठे सरदार यांचें वर्तमान, लिहिलें जाईल. प्रथम विजापूर व अहंमदनगर व गोंवळकोंडा या तिहीं राज्यांत बादशाह कितीं झाले तो प्रकार.

| विजापूर. | अहंमदनगर. | गोंवळकोंडा. |
|---|---|---|
| विजापूरचा बादशाह पहिला सुलतान यूसफ आदिलशाह.तो सन चौदाशें एकुणनवदांत तक्ताधिपति झाला आणि सन पंधराशें दाहांत मरण पावला. | अहंमदनगरचा बादशाह पहिला मलिक अहंमद,तो निजामउल्मुल्कबहिरी असें नाव पावून सन चौदाशें सत्तेहत्तरांत राज्य करूं लागला आणि सन पंधराशें आठ सुमार तेव्हां मृत्यु पावला. | गोंवळकोंड्यांचा बादशाह पहिला कुतुबउल्मुल्क नामें सन पंधराशें बारांत झाला, तो पंधराशें एकावन्नांत कारभाऱ्यांनीं मारिला. |
| त्याचा पुत्र दुसरा सुलतान इस्मायल् आदिलशाह त्याचे जागीं बसविला.तो सन पंधराशें चौपन्नांत मरण पावला. | त्याचा पुत्र दुसरा सुलतान बुराहण निजाम झाला,तो पंधराशें त्रेपन्नांत मरण पावला. | त्याचा पुत्र दुसरा सुलतान जमशीद,तो सात महिने राज्य करून मेला |
| त्याचा पुत्र तिसरा सुलतान मलू आदिलशाह त्याचे ठिकाणीं स्थापिला,तो सन पंधराशें पंचावन्नांत पदच्युत झाला. | त्याचा पुत्र तिसरा सुलतान् हुसेन निजामशाह तक्तावर बसविला.तो पंधराशें छपन्नांत मृत्यु पावला. | त्याचा भाऊ तिसरा सुलतान इभ्राम कुतुबशाह बादशाह झाला, तो पंधराशें एक्याऐशींत मृत्यु पावला. |
| | | त्याचा पुत्र चवथा सुलतान महंमद कुली कुतुबशाह झाला तो मेल्यानंतर त्याचा भाऊ सुलतान अबदुला कुतुबशाह झाला. |

| | | |
|---|---|---|
| त्याचा भाऊ चवथा सुलतान् इभ्राहीम् आदिल्शाह स्थापिला, तो संन पंधराशें सत्तावन्नांत मरण पावला. | त्याचा पुत्र चवथा सुलतान मोर्तिजा निजामशाह झाला, तो त्याचे पुत्रानें संन पंधराशें सत्याहत्तरांत मारिला, आणि आपण तख्ताधिपति झाला. | इतकीं प्रकरणें सन् इसवी चाकाचे मुळापासून सोळाशें पर्यंत झालीं. याखेरीज राहिलीं तीं पुढचे भागीं येतील. |
| त्याचा पुत्र पांचवा सुलतान आदिलशाह झाला, तो संन पंधराशें ऐशींत कारभाऱ्यांनीं कपटानें मारिला. | त्याचें नाव सुलतान हुसेन निजामशाह बादशाह. त्याणें दोन महिनें राज्य केलें नंतर कारभाऱ्यांनीं त्यास मारिलें. | |
| त्याचा पुत्र साहावा सुलतान इभ्राहीम् आदिलशाह, तो त्याचे स्थानीं बसविला, त्याचे मरणाचा प्रकार तिसऱ्या भागांत येईल. | त्याचा भाऊ साहवा सुलतान इस्मायल् निजामशाह झाला तो तख्ताधिपति असतां त्याला त्याचे बापानें काढून दिलें आणि आपण तें पद घेतलें. त्याचें नाव सुलतान बुराहण निजामशाह, तो सातवा झाला आ- | |

| णि सन पंधराशें चौ |
| --- |
| ऱ्याण्णवांत मरणपा |
| वला. |

४ सन इसवी शकाचे चौदाशें अठ्याण्णवांचे पांचवे महिन्यांत फिरंगी (पोर्टुगीस्) लोक यांच्या जातीचा एक वास्कोदिगानामें मोठा सरदार बरोबर फिरंगीलोक घेऊन जाहाजांत बसून आला, तो कारकोळ देशांत समुद्रतीरीं एक कलिकतनामें शहर आहे तेथें उतरला; आणि युद्ध न करितां त्या देशांत आपल्या लोकां सहवर्तमान सुखवस्तीस राहिला. त्याचा बेत सुखवस्तीसच राहावें असा नव्हता, यास्तव सन पंधराशें सातांत चौल शहराजवळ मिस्त्रीलोक यांचे लढाऊ गलबतांची व फिरंगीलोकांचे लढाऊ गलबतांची गांठ पडतांच उभयतां मोठ्या निकरानें लढले. नंतर निजामउल्मुल्कबहिरी याशीं पोर्टुगीसलोकांनीं सख्य केलें, आणि समुद्रांत व मुलखांत उपद्रव करूं लागले; ते सन पंधराशें आठांत दाभोळचे खाडींतून येऊन दाभोळ लुटून गेले. तेसमयीं त्यांचे हातीं कांहींच मुलूख लागला नव्हता. नंतर तुळव्याचा तिमोजीनामें एक समुद्रांतला लुटारू होता, तो पोर्टुगीसलोकांचा जो आल्बरकर्कनामें सरदार होता, त्यास मिळाला. मग त्याणें त्याचे मसलतीनें सन पंधराशें दाहांचे दुसरे महिन्याचे सत्ताविसावे तारखेस छापा घालून गोंवें घेतलें. तें त्यावेळेस विजापूरचे राज्याखालीं होतें, ह्मणून विजापूरचा बादशाह यूसफ् आदिल्शाह फौजेसहित आला, आणि त्याणें लढून गोंवें परत घेतलें. त्यानंतर त्याच वर्षाचे दाहावे महिन्याचे पंचवि

सावे तारखेस पुनः पोर्तुगीसलोकांनी गोवें घेतलें, तें आजपर्यं
त त्यांजकडेसच आहे. त्या पुढें संन पंधराशें बत्तिसांत ते लोक
जाहाजांतून आले, ते चिंचणी तारापुरी येऊन उतरले, आणि
त्यांणीं तेथपासून वसईपर्यंत मुलूख लुटला. तेवेळेस वसईचा
किल्ला नवाच बांधलेला होता तो पाडिला; आणि ठाणें व मुंबई शह
र यांची खंडणी घेतली. त्या पुढें दोन वर्षांनीं दमान घेतलें. त्या
समयीं गुजराथेंत सुलतान बाहादूर नामें बादशाह होता, तो दि
ल्लीचे बादशाहाशीं लढून केवळ बळहीन झालेला असा पाहून
फिरंगीलोक त्याला ह्मणूं लागले कीं, आह्मांस वसई परगणा द्या
वा, आणि काठेवाडांत दिऊ येथें किल्ला बांधावयास जागा द्या
वी, आणि आरबस्थानचे जाहाजांचे जकातींत आह्मास कांहीं
विभाग असावा, ह्मणजे आह्मी दिल्लीचे बादशाहाशीं लढाई क
रावयास तुमचे कुमकेला येऊं; या प्रमाणें त्याचें बोलणें मान्य क
रावयास सुलतानास मोठ्या अडचणीमुळें अगत्य पडलें. नंतर
ते पोर्तुगीस लोक कितीएक वर्षें लोकांस उपद्रव न करितां आपल्या
मुलखाचा बंदोबस्त करून राहिले होते. पुढें संन पंधराशें अठ्ठेचा-
ळीसांत त्यांणीं समुद्रतीरचा मुलूख बाणकोटापासून गोमांतकाप
र्यंत लुटला, आणि जाळिला. तो मुलूख तेसमयीं विजापूरचे रा
ज्याखालीं होता. त्या पुढें संन पंधराशें एकाहत्तरपर्यंत त्या लोकां
चें वर्तमान विशेष लिहावें असें झालें नाहीं.

५ त्यावर्षीं विजापूरचा बादशाह व अहमदनगरचा बादशाह हे
दोघे मिळून फिरंगी लोकांशीं लढाई करावयास गेले, ते गोवें आणि
चौल शहर या दोहोंस वेढा घालून लढूं लागले, परंतु पोर्तुगीस लोकांपु
ढें त्यांचें बळ चाललें नाहीं, ते आपणच पराभव पावले. आपल्याजानिसभावा

प्रमाणें उगेच बोलूं लागले कीं, यांचें युद्ध शौर्य युक्त नाहीं, हे कप टानें लढतात, असें भाषण करीत करीत पळून गेले.

६ आतां मराठे सरदार यांचें वर्तमान. विजापूरचे बादशाहाचे चाकरीस मुख्य ले मराठे सरदार होते. एक चंद्रराव मोरे, दुसरे राव नाईक निंबाळकर, ज्यांस फलटणराव ही ह्मणत होते, तिसरे झुंझारराव घाटगे, चौथे राव माने, पांचवे घोरपडे, साहावे डफळे, सातवे सावंत बहादर, वाडीचे देशमूख, वगैरे विजापूरकरांकडे होते. अहंमदनगरकरांजवळ जे होते त्यांत एक राव जाधव दुसरे राव भोंसले, यांखेरीज आणखी दुसरे बहूत न्यून पदांचे होते. विजापूरवाल्यांचे चंद्रराव मोरे यांचें मूळ असें आहे कीं, पूर्वीं करनाटकांत एक मोरे आडनावाचा नाईक होता, त्याला यूसफ आदिलशाह विजापूरचा बादशाह याणें हिंदवी पायदळ फौज बारा हजार देऊन निरा आणि वारणा या दोहोंनद्यांचे मधला मुलूख, जो घ्यावयास कठीण फार अडचणीचा असा होता, तो घ्यावयाचें काम सांगितलें. ते समयीं त्या मुलखांत शिरके यांचे मूळ पुरुष होते, आणि त्यांचे सहाय गुजर, मामूलकर, मोहिते, महाडीक, वगैरे होते. असें असतां मोरे यांणीं तेथें जाऊन ते शिरके व त्यांचे सहाय जिंकून तो मुलूख घेतला. एवढें काम केलें ह्मणून बादशाह याणें त्याचे नावाला चंद्रराव असें पद जोडून तो जावळीचा राजा केला. ते मोरे त्या पुरुषापासून पुढें सात पुरुष पर्यंत तेथेंच होते. त्यांणीं तें राज्य उत्तम नीतीनें केलें ह्मणून बहूत लोक येऊन तो मुलूख वस्तीस योग्य नसतां तेथेंच राहिले. त्या बादशाहानें ठेविलेलें चंद्रराव असें नाव मोरे यांचे सातां पिढ्यांस चालिलें. ते

बादशाहाचे आज्ञेंत वागत ह्मणून बादशाह त्यांचे मुलखाचा वसूल आपलें स्वामित्व मात्र राखावयास फार थोडा घेत असे. ज्यांस फलटणराव नाईक ह्मणत तेच निंबाळकर, त्यांचे कुळीचें पूर्वंशेचें नांव पवांर असें होतें. त्यांचा मूळपुरुष निंबाळीक गांवीं राहात होता, त्या गांवास आतां निंबळक ह्मणतात. हें कूळ मराठे लोकांत पुरातन आहे. यांचे पहिल्या पुरुषांस फलटणदेशाचे देशमुखीचा विभाग होता. संन सोळाशें चा ळिसांचे सुमारें विजापूरचे बादशाहानें त्यांस सरदेशमुखी दिली. त्यांणीं आपलें नांव बदलून दुसरें केलें नाहीं, जें पहिलें नाईक असें होतें तेंच चालविलें. संन सोळाशें सुमारें त्या कुळाचा एक पुरूष वंगोजी नाईक होता, त्याला लोक जगपाळ ह्मणत, तो मोठी पुंडाई करीत असे. त्याची वहीण ती शिवाजी राजाची माय आजी. मलावरीचे देशमूख जुंझारराव, ते घाटगे यांचे कुळांत श्रेष्ठ होते; त्यांचें राहाणें खटांवदेशीं असे. त्यांचे देशाची मर्यादा व निंबाळकर यांचे देशाची मर्यादा या दोहोंमध्यें महादेवाचा डोंगर. ते घाटगे मान परगण्याचे देशमूख होते. त्यांचे मूळ पुरुषास ब्राह्मणीवंशाचे बादशाहानें मनसब+ दिली होती. ती तारीख कोणती व बादशाह कोणें नावाचा होता तें कळत नाहीं. विजापूरचा बादशाह इभ्राहीम आदिलशाह यानें

+ मनसब ह्मणजे, मोंगलाईत स्वारांचे सरदारी सारिखा अधिकार होता, तो कधीं कधीं दाहा हजार स्वारांचा असे. ते लोक त्याचे खर्चाप्रमाणें त्यास जाहागीर देत असत.

घाटगे यांस *सरदेशमुखी व झुंजारराव असें नाव सन सोळा शें सव्विसांत दिलें. पूर्वीपासून घाटगे यांचे कुळाचा स्वभाव आपल्या आपल्यांत भांडावें असा लोकांत प्रसिद्ध आहे. मानेयांचे मूळपुरुष म्हसवडचे देशमूख होते, त्यांची जागा व घाटगे यांची जागा दोन्ही शेजारीं होत्या; ते विजापूरकरां जवळ शि+लेदारी करून विख्यात झाले. घोरपडे यांचें मूळचें उपनाव भोसले होतें, त्यांचा एक पुरुष कोंकणचा मोठा कठीण किल्ला घ्यावया करितां घोरपडीचे कमरेस व आपल्या कमरेस एक दोरी बांधून घोरपड किल्ल्यावर चढवून त्या दोरीवरून आपण किल्ल्यावर गेला आणि तो किल्ला घेतला, ह्मणून त्याचें नाव घोरपडे पडलें आहे, असें जुने बखरेवरून वाटतें. विजापूरचे बादशाहींत त्यांची देशमुखी होती. त्याचे कुळास दुसरीं नावें त्या नावांतच दोन होतीं, एक ‡कापशे आणि एक मुधोळ. कापशे वारणातीरीं होते, आणि मुधोळ घटप्रभेचे कांठीं असत. डफळे विजापुराजवळ झट परगणा आहे तेथचे देशमूख, यांचें पूर्वीचें उपनाव चव्हाण, हे डफळापुरीं पाटिलकी करीत ह्मणून यांचें नाव डफळे असें पडलें. विजापूर सरकारांतून त्यांस मनसब अधिकार मिळाला होता, परं

---

* सरदेशमुखास विजापूरचे बादशाहींत वसुलाचा विभाग किती होता तो कळत नाहीं, परंतु दिल्लीचा औरंगजेबबादशाह याचे वेळेस किती एकां सरदेशमुखांना शेंकडा दोन रुपये प्रमाणें विभाग होता.

\+ शिलेदार ह्मणजे जो आपल्या स्वतःच्या घोड्यावर बसून धण्याची चाकरी करितो तो, आणि जो धण्याचे घोड्यावर बसून चाकरी करितो तो बारगीर.

‡ कापशेयांस विजापूरचे सरकारांत नवकस ह्मणत, आणि मुधोळांस सातकस ह्मणत.

तु दुसरें कांहीं वेगळें नाव मिळालें नाहीं. सावंत पहिले पासून वाडी चे देशमूख, त्यांणीं पोर्तुगीस लोकांशीं फार चांगली लढाई केली ह्मणून बादशाहानें त्यांचे नावास बहादर असें पद जोडिलें, त्या पासून सावंत बाहादर असें त्यांस लोक ह्मणूं लागले. त्यांचें मूळचें उपनाव भोंसले. त्यांजवळ नुसती पायदळ फौज होती, आणि त्या मुलखीं दुसऱ्या फौजेचा उपयोग ही नव्हता. त्या वाडी प्रांतास कुडाळ देश ह्मणत.

७ अहंमदनगरचे राज्यांत एक मराठा सरदार मुख्य होता त्याचें नाव जाधवराव, तो शिंदकेरचा देशमूख, त्याचा मूळपुरुष देवगडचा राजा असेल. असें वाटतें कीं, सर्व मराठ्यांचें कुळांत जाधवरावा प्रमाणें दुसरा प्रतापी नव्हता. सन सत्राशांच्या सुमारें निजामशाह बादशाहाचे सरकारांतून त्याला दाहा हजार स्वारांची सरदारी सांगून त्याचे बंदोबस्तास जहागीर दिली होती. दुसरे मुख्य सरदार भोंसले ते मोठे कुलीन होते असें वाटतें कीं, त्यांची पाटिलकी बहुतां जागीं होती, परंतु त्यांचे राहावयाचें ठिकाण दवलताबादे जवळ वेरूळ ह्मणून गांव आहे तें. पहिले बाबजी भोंसले यांस पुत्र दोघे, त्यांत वडील विठोजी आणि धाकटा मालोजी. त्याला जगपाळराव नाईक निंबाळकर फलटणचा देशमूख याची बहीण दिपाबाई दिली होती. तो मालोजी भोंसला पंचवीस वर्षांचा झाल्यावर आपल्या बरोबर किती एक स्वार घेऊन लुखजी जाधवाचे आश्रयानें मोर्तिजा निजामशाह बादशाह याचे चाकरीस राहिला. हें वर्तमान सन पंधराशें सत्याहत्तरांत झालें. त्या मालोजीस पुत्र नव्हता ह्मणून त्याणें मोठी देवसेवा केली, परंतु पुत्र झाला नाहीं. मग अहंमदनगरीं एक मुसलमान आतीचा

शाह सरीफ नामें मोठा अवलिया होता, त्याणें आपल्या देवा जवळ विनंती करून मालोजीस सांगितलें कीं, तुला पुत्र होईल. नंतर कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री दिपाबाई गरोदर होऊन प्रसूत झाली, तों पुत्र झाला. मालोजीनें तो सिद्धाचे प्रसादें करून झाला असें जाणून त्या मुलाचें नाव शाहाजी ठेविलें. त्यावर दुसरे वर्षीं दुसरा पुत्र झाला, त्याचें नाव सरीफजी ठेविलें. त्या शाहाजी भोंसल्याचें जन्म पंधराशें चौऱ्याण्णवांत झालें. मालोजी भोंसले उत्तम प्रकारें सरकार चाकरी करून अधिक योग्यता पावूं लागले, आणि ज्या जाधवाचे आश्रयानें चाकरी मिळविली तो लुखजी जाधवरावही त्यावर बहूत कृपा करूं लागला. मालोजीचा पुत्र शाहाजी रुपानें फार चांगला होता. संन पंधराशें नव्याण्णवांत शिमग्यामध्यें मालोजीनें आपल्या पुत्रास लुखजी जाधवरावाकडे भेटायास नेलें. तेव्हां जाधवराव त्या मुलाचें रूप पाहून बहुत खुष होऊन त्यास जवळ बोलावून जिजाबाई त्याची कन्या मांडीवर होती तिला बोलिला कीं, हा तुला नवरा पाहिजे काय? आणि मंडळीस ह्मणूं लागला कीं, हाजोडा कसा दिसतो? इतक्यांत तीं दोन्हीं मुलें एकमेकांवर गुलाल उधळून खेळूं लागलीं, तें पाहून सर्व मंडळीस चमत्कार वाटला, आणि हांसूं लागले. ते वेळेस मालोजी भोंसले उभे राहून बोलिले कीं, ऐका हो सर्व मंडळी! आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले, यास तुह्मी साक्षी आहांत. तेव्हां त्या मंडळींत कोणी कोणी ह्मणाले कीं, हें ठीक आहे. तें ऐकून जाधवराव खिन्न होऊन उगाच राहिला, कांहीं बोलिला नाहीं. त्यानंतर दुसरे दिवशीं जाधवानें त्या मालोजीस भोजनास बोलाविलें, तेव्हां तो ह्मणाला कीं, तुह्मी व्याही व्हाल तर मी येईन,